# ज्ञानदीप

वार्षिकांक : २०२५-२६

# ग्रामसंस्कृती

## परंपरा । संस्कृती । समृध्दी





श्री गजानन शिक्षण प्रसारक मंडळ, येलदरी कॅम्प

ता.जिंतूर जि.परभणी

आधारस्तंभ व प्रेरणास्थान



# मा.बी.आर. तोष्णीवाल

अध्यक्ष, श्री गजानन शिक्षण प्रसारक मंडळ,
येलदरी कॅम्प ता.जिंतूर जि.परभणी



# प्राचार्य डॉ. एस. जी. तळणीकर

तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
सेनगांव ता. सेनगांव जि. हिंगोली


सेनगांव
ज्ञानदीप
वार्षिकांक : २०२५-२६
ग्रामसंस्कृती
परंपरा । संस्कृती । समृध्दी

श्री गजानन शिक्षण प्रसारक मंडळ, येलदरी कॅम्प संचलित,

# तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सेनगांव

ता.सेनगांव जि.हिंगोली

## संचालक मंडळ

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | श्री. ब्रिजगोपाल रामनारायण तोष्णीवाल | अध्यक्ष |
| २ | श्री. सुभाषअप्पा विश्वनाथअप्पा एकशिंगे | उपाध्यक्ष |
| ३ | श्री. उमराव माणिकराव शेळके | सचिव |
| ४ | सौ. सरोज घनशामदासजी गट्टाणी | सहसचिव |
| ५ | श्री. सुजितकुमार शामसुंदर मुंदडा | कोषाध्यक्ष |
| ६ | श्री. पुरुषोत्तम किशनलाल दरक | सदस्य |
| ७ | श्री. गोविंदप्रसाद रामनारायण तोष्णीवाल | सदस्य |
| ८ | सौ. लिलादेवी गिरधारीलाल तोष्णीवाल | सदस्य |
| ९ | श्री. रमण गिरधारीलाल तोष्णीवाल | सदस्य |
| १० | डॉ. श्रीपाद गजाननराव तळणीकर | प्राचार्य |

*श्री गजानन शिक्षण प्रसारक मंडळ, येलदरी कॅम्प द्वारा संचलित*

## तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सेनगांव, जि. हिंगोली

# ज्ञानदीप वार्षिकांक

**विषय (Theme)** : ग्रामसंस्कृती

**प्रकाशन** : २०२५-२६

**प्रकाशक** : प्राचार्य डॉ. एस.जी. तळणीकर
(तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सेनगांव)

**मुख्य संपादक** : डॉ. दत्ता सावंत

**सह-संपादक** : डॉ. विजय वाघ

**विद्यार्थी संपादक मंडळ** : पुजन ओमप्रकाश तोष्णीवाल
निकिता शंकर दैठणकर
गायत्री शंकर काळबांडे
रेणुका संतोष मांदळे
निकिता अश्रप्पा शेरकर
करण वसंत नायक
ओंकार प्रल्हाद कोळपे
भागवत पंडितराव थोरात

**वार्षिकांक समिती** : प्रा. प्रमोद घन
डॉ. शंकर पजई
डॉ. राजेश गोरे
डॉ. अंजली टापरे
डॉ. भगवान घुटे

**मुखपृष्ठ** : अनिल गरड

**वृत्तसंकलन** : डॉ. गोविंद भालेराव

**अक्षरजुळवणी** : अनिल गरड, प्रशांत काटकर

**मुद्रण** : महेश ऑफसेट, परभणी.



**हक्क ©** : सर्व हक्क प्रकाशकाधिन

टिप : या अंकातील प्रत्येक लेखकाचे मत व विचार व्यक्तीगत असून संपादक व प्रकाशक त्यांच्याशी सहमत असतीलच असे नाही.

# मनोगत...

प्रिय विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो,

नमस्कार,

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षाचा आपल्या महाविद्यालयाचा 'ग्रामसंस्कृती' विषय असलेला 'ज्ञानदीप' वार्षिकांक प्रकाशीत झालेला आहे. हा वार्षिकांक वाचक, रसिकांच्या हाती देतांना मनस्वी आंनद होत आहे. आमचे महाविद्यालय ग्रामीण, डोंगरी व अति दुर्गम भागातील शैक्षणिक अडचणी लक्षात घेऊन उच्च शिक्षणाचे पवित्र कार्य गेली दोन-अडीच दशकापासून करित आहे. आज महाविद्यालयाचा विस्तार एखाद्या वटवृक्षाप्रमाणे वाढतच आहे ही आपणा सर्वांसाठी कौतुकाची बाब आहे हे सत्य नाकारून चालणार नाही.

विशेष म्हणजे महाविद्यालयात शिक्षण घेणारे विद्यार्थी ग्रामीण भागातील आहेत. त्यांचा सर्वांगीन विकास व्हावा हाच उद्देश महाविद्यालयाचा असल्यामुळे त्या दृष्टीने महाविद्यालयात विविध उपक्रमाचे आयोजन केले जाते. उदा. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, विज्ञान प्रदर्शन, गांधी विचारावर कार्यशाळा, वाद विवाद स्पर्धा, विद्यार्थी-पालक मेळावा इतकेच नव्हे तर सांस्कृतिक विभागाद्वारे विविध कार्यक्रम, राष्ट्रीय सेवा योजना द्वारे सामाजिक जागृती, विद्यार्थीमध्ये वैज्ञानिक जाणीव जागृती घडवून रोजगार विषयक माहिती, व्यवसायाविषयक माहिती दिली जाते. त्याच बरोबर त्यांच्या सुप्त कला गुणांना अधिक वाव मिळवा, या भावनेतून महाविद्यालयाचा प्रत्येक घटक कार्यरत असतो. त्याच्या सामाजिक जाणीवा अधिक प्रगल्भ होवून तो या देशाचा आदर्श नागरिक घडावा हाच आमचा प्रामाणिक हेतू आहे.

महाविद्यालय येणाऱ्या काळातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी अध्ययन, अध्यापन, मुल्यांकन व संशोधन या दैनंदिन कार्यांबरोबरच नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० प्रमाणे सामाजिक उपक्रम व शैक्षणिक गुणवत्ता यासाठी देखील सुसज्ज आहे.

विद्यार्थ्यांच्या प्रतिभाशक्तीला अधिक चालना मिळावी, भविष्यात लेखक, कवी, कथाकार निर्माण व्हावेत यासाठी यावर्षी संपादक मंडळाने व विद्यार्थ्यांनी 'ग्रामसंस्कृती' हा विषय घेऊन 'ज्ञानदीप' वार्षिकांक काढला आहे. यासाठी संपादक व सदस्य यांचे फार मोठे योगदान आहे. संपादक मंडळातील सर्व सदस्य, विद्यार्थी -विद्यार्थीनींचे मी कौतुक करतो. विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडविणारे अधिका-अधिक नाविन्यपूर्ण उपक्रम यापुढेही राबविले जातील. विद्यार्थ्यांच्या भविष्यातील उज्ज्वल वाटचालीसाठी शुभेच्छा देतो. पुन्हा एकदा सर्वांना धन्यवाद देतो.

जयहिन्द !

**प्राचार्य डॉ. एस.जी. तळणीकर**

# संपादकीय...

''उत्तिष्ठ जागृत प्राप्य वरान्नीबोधत'' म्हणजे उठा, जागे व्हा आणि तुम्हाला मिळालेले वरदान ऐका. म्हणजे त्याला प्रतिसाद द्या व त्याप्रमाणे कार्य करत रहा. वरील संबोधन हे आमच्या महाविद्यालयाचे ब्रीद असून गेली तीन दशकांहून अधिक काळ त्यानुसारच महाविद्यालयाची वाटचाल सुरु आहे. याच वाटचालीचा भाग म्हणून मागील एका तपापासून महाविद्यालयाचा 'ज्ञानदीप' हा वार्षिक अंक काढला जातो. या अंकामध्ये विद्यार्थ्यांचे वैचारिक व ललित साहित्य प्रसिद्ध केले जाते. दरवर्षी विद्यार्थी वेगवेगळ्या विषयांवर लिहित असतात. यातून त्यांची साहित्यिक, वैचारिक क्षितिजे रुंदावण्याचे काम होत असते. विद्यार्थी एखाद्या विषयावर कसा विचार करतात? त्यांच्या भाव-भावना काय असतात? ते कसे लेखनातून व्यक्त होतात? या व अशा अनेक घटकांचा परामर्श या अंकातून घेतला जातो.

म. गांधी यांनी 'खेड्याकडे चला' असा संदेश दिला होता. त्यांच्या मते, आपल्याला भारत हे एक महान राष्ट्र घडवायचे असेल, तर भारतीय खेडी स्वयंपूर्ण झाली पाहिजेत. कारण आजही मोठ्या प्रमाणात भारत हा गाव-खेड्यांमध्येच वसलेला आहे. आपल्या खऱ्या समाज-संस्कृतीचे दर्शन करायचे असेल तर आजही आपल्याला गावाकडे जावे लागते. आपला गाव, आपले खेडे हे समृद्ध असे संस्कृतीचे दालन आहे. तेथील जीवन, जाण्याच्या पद्धती, लोकमानस, प्रथा-परंपरा ह्या आगळ्या-वेगळ्या आहेत. जागतिकीकरणाच्या, तंत्रज्ञानाच्या रेट्यामध्ये देखील आपली खेडी टिकून आहेत. तेथील लोकजीवन, लोकसंस्कृती टिकून आहे. आणि म्हणून या लोकजीवनाचा, लोकसंस्कृतीचा परामर्श घेणे आम्हाला महत्वाचे वाटले. त्यातूनच या वर्षीच्या म्हणजे २०२५-२०२६च्या 'ज्ञानदीप' या अंकाचा विषय ठरवण्यात आला-ग्रामसंस्कृती. ज्यावेळी हा विषय विद्यार्थ्यांना सांगण्यात आला, त्याच्यापर्यंत प्रसारित करण्यात आला, त्यावेळी त्यांचा खूप मोठा प्रतिसाद मिळाला. या विषयाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांसाठी एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली व विषयाची व्याप्ती ठरवण्यात आली. कारण ग्रामसंस्कृती किंवा लोकसंस्कृती तसं पाहिलं तर खूप मोठा विस्तार असलेला विषय आहे. विद्यार्थ्यांना याची कल्पना यावी म्हणून त्यांना काही ठळक घटक देण्यात आले. त्यामध्ये प्रामुख्याने ग्रामीण भागात साजरे करण्यात येणारे सण-उत्सव, कृषी संस्कृती, शेती-भाती, गाव-खेडे यांचे बदलते स्वरूप (जुने-नवे गाव), यात्रा वा जत्रा, त्याचे स्वरूप, नाती-गोती, पाहुणचार, मान-सन्मान, लग्न समारंभ, त्यातील विधी, लहानपणातील खेळ, जुनी-नवी मनोरंजनाची साधने, गाव-खेड्यातील निसर्ग, झाडे-फुले-पाने, प्राणी (पाळीव-जंगली), दैनंदिन नित्यक्रम, लोकांचे जगणे, शेतकरी, शाळा, शिक्षण, उपक्रम, गाव-निवडणुका, जात्यावरच्या ओव्या, लोकगीते, भाषा, बोली, आणि गाव-खेड्याशी निगडीत असलेला कोणताही घटक यावर कथा, कविता, लेख, निबंध किंवा संशोधनपर लेखन करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना करण्यात आले.

महाविद्यालय ग्रामीण भागात कार्यरत असल्यामुळे विद्यार्थ्यांना सदरील विषय अतिशय जवळचा वाटला. उत्साहाने व आनंदाने त्यांनी यावर लेखन करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यासाठी जवळपास नव्वद विद्यार्थ्यांनी समितीकडे नावनोंदणी केली. त्यापैके अनेक विद्यार्थ्यांनी त्यांचे वैचारिक व

ललित साहित्य समितीकडे सुपूर्द केले. त्यानुसार त्यांच्या साहित्याचे भाषावार तीन भागात वर्गीकरण करण्यात आले. मराठी, हिंदी व इंग्रजी. विद्यार्थ्यांचे भाषा व विचार कौशल्य लक्षात घेऊन त्यांच्यामधून विद्यार्थी संपादक मंडळ निवडण्यात आले. या संपादक मंडळाने विषयाशी निगडीत असलेल्या साहित्याची निवड केली. त्यानंतर निवडलेल्या साहित्यावर मुख्य संपादक, त्यांचे सहकारी व विद्यार्थी संपादक यांनी विशेष असे संस्कार करून ते अंकात सामाविष्ट करण्यायोग्य बनवले. मराठी व हिंदी विभागात आनेक ओव्या, जात्यावरची गाणी, लोकगीते, त्यावरील लेख यांचे संकलन करण्यात आलेले आहे. तर इंग्रजी विभागात गावाकडे साजरे केले जाणारे मुख्य सण-उत्सव, लहानपणीचे मुला-मुलींचे खेळ, निसर्ग वर्णन व त्याचबरोबर ओव्या, भारुड, जात्यावरची गाणी यांचे अनुवाद संकलन करण्यात आलेले आहे. त्यामुळे ग्रामसंस्कृती हा अंक ग्रामीण जीवनाचे, लोक-संकृतीचे प्रतिबिंब बनलेला आहे. यातून गाव संस्कृतीला भेट दिल्याचा प्रगल्भ असा अनुभव वाचकाला आल्याशिवाय राहत नाही.

आम्हाला प्रस्तुत अंकनिर्मितीमध्ये ज्यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहाय्य मिळाले त्यांचे ऋण व्यक्त करणे अगत्याचे ठरते. ज्यांच्या प्रेरणेतून हा अंक सुरु झाला ते श्री गजानन शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. श्री ब्रिजगोपाल रामनारायण तोष्णीवाल, महाविद्यालय विकासाच्या कोणत्याची कार्याला प्रोत्साहन देणारे संस्थेचे उपाध्यक्ष मा. श्री सुभाषअप्पा विश्वनाथ एकशिंगे व संस्थेचे सचिव मा. श्री उमराव माणिकराव शेळके, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष तथा संस्थेचे सदस्य मा. श्री रमण गिरधारीलाल तोष्णीवाल, महाविद्यालयाचे प्राचार्य, ज्यांनी या विषयाला मान्यता दिली प्रा. डॉ. एस. जी. तळणीकर, तसेच या समितीत व संपादक मंडळ म्हणून कार्य करणारे आमचे सर्व सहकारी व विद्यार्थी या सर्वांचे आम्ही या ठिकाणी विशेष आभार व्यक्त करतो. या सर्वांच्या मार्गदर्शन, प्रेरणा व सहकार्यातून ग्रामसंस्कृती हा अंक आकार घेऊ शकला. अंकाच्या कार्यात साहित्य लेखन करून त्याला अक्षरबद्ध करण्याचे मोलाचे कार्य ज्या विद्यार्थ्यांनी केले त्या सर्वांचे येथे आम्ही मनस्वी कौतुक करतो. या अंकाला प्रत्यक्ष कागदावर उतरवून एका देखण्या पुस्तकात रुपांतरीत करण्याचे अतिशय महत्वाचे काम महेश ऑफसेट, परभणी व त्याच्या सहकाऱ्यांनी केले आहे. त्या सर्वांचे संपादक मंडळ आभारी आहे. अंकासाठी ग्रामीण संस्कृतीशी संबंधित असलेले मुखपृष्ठ व मलपृष्ठ तयार करण्यासाठी परिश्रम घेणारे श्री अनिल गरड यांचे विशेष आभार. या सर्वांच्या सहकार्यातूनच ग्रामसंस्कृती हा अंक अतिशय देखणा व वाचनीय झालेला आहे. ग्राम-लोकसंस्कृतीचे प्रतिबिंब वाचायला व त्या आठवणींमध्ये हरवून जायला, तो अनुभव घ्यायला वाचकांना नक्कीच आवडेल अशी अपेक्षा आहे.

धन्यवाद!

संपादक मंडळ

* * * * * * * * *

# अंतरंग

* * * * * * * * *

## मराठी विभाग

संतवाणी/मयुरी अवस्थी /१०
निसर्ग /सलोनी अवस्थी /१०
चैत्राची पालवी ते फाल्गुनी रंग :
गावाच्या आठवणीची शिदोरी...कु. रेणुका मांदळे/११
जात्यावरच्या ओव्या/मयुरी अवस्थी/१४
जात्यावरच्या ओव्या/मयुरी अवस्थी /१४
त्यागाची मूर्ती आई 'रमाई' ????/शरद नरवाडे/१५
वासुदेवाची स्वारी /अनुराधा वाघ /१५
ग्रामसंस्कृती आणि भारतीय समाज/प्रवीण खिल्लारी/१६
ऐतिहासिक हिंगोली/राधा तारे/१७

## हिंदी विभाग

किसान/घुगे ओंकार/१९
गौ हित अनुसंधा : गौ संरक्षण, संवर्धन और राष्ट्र निर्माण की दिशा में एक समग्र चिंतन/सौ.सरोज गट्टाणी/२०
ग्रामीण मुहावरे / मस्के बाजीराव/२३
ग्रामीण संस्कृति/शेळके राजेश/२४
किसान /कापसे त्रंबक/२४
ग्रामीण त्योहार/कोकाटे देविदास/२५
मेरा गाँव /कुंदर्गे उध्दवराव/२५
ग्रामीण जीवन/कुंदर्गे प्रतिज्ञा /२६
गाँव की सुबह/मोरे अमृता/२६
हल/गडदे प्राजक्ता /२७
बैलगाड़ी / वाघमोडे प्राची /२७
ग्रामों में गाय का महत्व/पोले पल्लवी /२८
मेरा प्यारा गाँव/संगेकर नागेश/२८
गोबर/घन प्रतुषा/२९
मेरा ग्राम/नरवाडे संदिप/२९
ग्रामोन्नति/धबडगे उषा/३०
चलें हम गाँव/ढवळे कल्याणी /३०
ग्रामीण जीवन/साहु स्नेहा /३०
लोकगीत/ बांगर रूपाली/३१
महाराष्ट्र के लोकगीत/बांगर आचल /३१
ग्रामीण शिक्षा अभियान/राठोड संतोष/३२
आदर्श गाँव/पोहकर गजानन/३२
ग्रामीण संस्कार/ चिभडे लक्ष्मण/३३
शेरों - शायरी/सावळे करण/३३
मेरा गाँव /पठाण अरबाज फेरोज /३४
मेहनत का फल/फटांगळे सानिका /३४
चरवाहे के गीत/घुले सोमनाथ/३५
नदी/दन्नर अभिषेक /३५
ग्रामीण रास्ते/गिते रूपाली /३६
महाराष्ट्र के त्योहार/खंदारे शुभम /३६
ग्रामीण आदिवासी जीवन/रहाटे ओम /३७
किसान का जीवन/देशमुख केदारे /३७
अन्नदाता/धाबे पुण्यवर्धने /३७
महाराष्ट्र के प्राचीन खेल/राउत वैभव/३९
ग्रामपंचायत चुनाव/शुभांगी संगेकर/३९
त्योहार गीत/शर्मा महाविर /४०
ग्रामीण कहावतें/ पठाण आर्सीन जैरोदिन/४०
हिवरे बाजार - एक आदर्श गाँव/घुगे विद्या /४१
किसान/आकाश काळे /४१
ग्राम दैवत/शिंदे भुजंग /४२
गाय का बछड़ा/ऐश्वर्या जगन्नाथ भराडे/४२
गाँव के संदर्भ में डॉ. भीमराव आंबेडकर के विचार/वानरे रूपाली काशिराम/४३
भोजन की पंगत/टेकाळे बालाजी/४३
गाँव के संदर्भ में महात्मा ज्योतिराव फुले के विचार/ अंभोरे अराधना /४४
गाँव-ए.पी.जे.अब्दुल कलाम के विचार/जाधव साक्षी/४५
किसान की सुबह/जुमडे आशा /४५
सादगी की मिसाल/काळे राम/४५
ग्रामीण साप्ताहिक बाजार/कोरडे प्रियंका/४६
ग्रामीण शादी/खनपटे मेघा/४७
बारह बलुतेदार/गवळी भाग्यश्री/४८

## इंग्रजी विभाग

God within Self/Sanghmitra Thoke, /50
Marathi Powada :A Vibrant Tradition of Heroic Poetry/Monika Gaikwad/51
Powada on Chhatrapati Shivaji/Ravina Mulange/52
Gawalan: A Distinctive Form of Marathi Devotional Poetry/Poonam Phale/53
Bharud : A Popular and Didactic Form of Marathi Poetry/Payal Wakale/54
Sting of Scorpion by Sant Eknath/Durga Somose/55
Abhang on Shiva/Gayakwad Ramesh/55
Abhang : A Devotional Form of Marathi Poetry/Dethankar Nikita/56
Jatyawarchya Ovya: A Folk Tradition of Marathi Women's Poetry/Janvi Choudhari/57
Ashadhichi Ekadas: A Verse on Grinding Stone/Vaishnavi Bhalerao,/58
Dadala: A Bharud by Sant Eknath/Deshmukh Saloni /58
Game of the Soil/Sumedh Khillare/59
My Father/Laxmi R. Rodge/60
A Cultivator from My Village/Sakshi Gite/60
Festivals and Celebrations: A Reflection of Village Culture/Rajratan Khillare/61
Gawlanis of Mathura/Radhika Wable/63
Lagori, More than a Game/Pradnya Garpal/64
Hide and Seek from My Memory/Divya Tidke/65
Stained with Blood: A Red Flag/Khondkar Ramdas/66
Viti-Dandu: A Favourite Play in the Village/Nagesh Gite/67
Song of Turmeric Ceremony in a Wedding/Payal Thoke/68
Village Life through a Parrot's Eyes/Poojan Toshniwal/69
Baazaar/Poojan Toshniwal/70
Langadi/Tidke Pandurang/71
Lord of the Happiness/Kanchan Kamble/72
From Chaitra's New Leaves to Phalguna's Colors: A Bundle of Village Memories/Renuka Mandale, Vaishnavi Phad/73
Kolsa Village Fair: A Living Tapestry of Rural Culture/Poonam Thoke/76
God Khandoba Fair as a Cultural Depiction of Rural Life/Nikita Sherkar/78
Beloved Mother: An Ovi/Asmita Wakale/80
Elegy Written in a Country Churchyard/Gaurav Mule/80

## अहवाल विभाग

मराठी विभाग/८१
हिंदी विभाग/८५
Department of English/87
इतिहास विभाग/९१
राज्यस्तरीय वाद-विवाद स्पर्धा/९३
Department of Chemistry/96
Department of Dairy Science/98
Department of Physics/101
Internal Quality Assurance Cell (IQAC)/104
Department of Economics/106
परिक्षा विभाग पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ / १०८
International Conference /111
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक/११५
Department of Commerce /117
Department of Microbiology/119
Department of Geology/120
Central Library/122
Career Katta & Competitive Excamination Guidance Cell/124
Department of Fishery Science/126
समाजशास्त्र विभाग/१२९
माजी विद्यार्थी समीती/१३१
क्रिडा अहवाल/१३४
Student Mentor Scheme /141
राष्ट्रीय सेवा योजना/१४४
सांस्कृतिक विभाग/१५९



# मराठी विभाग

विद्यार्थी प्रतिनीधी

**गिते पवन तुळशीराम**

बी.ए. तृतीय वर्ष

**वाबळे राधिका गजानन**

बी.ए. द्वितीय वर्ष

**ठोके संघमित्रा प्रकाश**

बी.ए. द्वितीय वर्ष

# संतवाणी

ओव्या गाऊनी स्वरात,
दासी जणीच्या घरात,
दळण दळीले सख्या श्रीहरी आळ वी
चीराचा माझ्यावरी !!
असा कारे पांडुरंगा केलासी कावा,
अलंकार विसरुनी गेलास देवा,
वाक टाकली खांद्यावरती !!
असा कारे विठ्ठला तु माझ्या मुळावरी,
तुझ्यासाठी लवकर मला देती सुळावरी,
कुठे गेली तुझी जादुगिरी !!
दासी जणीचा तुच मायबाप,
तुझी चोरी करण्याचे नाही केले पाप,
देह जाणुनी तु अंतरी !!
हरीने ऐकुन जनाईची वाणी,
देवाने मुळाचे केले पाणी पाणी,
त्याने दाविली किमया खरी !!

**कु. मयुरी दिलीपप्रसाद अवस्थी**
बि.ए. प्रथम वर्ष

# निसर्ग

माझं सौंदर्य कधी पाहिलंच नसेल
माझं अनुभव कधी घेतलाच नसेल
माझ्या कुशीत कधी येऊन पहा
कधी मलाही तुम्ही जवळून पहा
डोंगराची वस्ती माझ्यात आहे
झाडे- वेलींची गर्दी माझ्यात आहे
नद्या,नाले,ओढे,धुंद ती हवा
कधी माझ्या अंगणात येऊन पहा
रिमझिम पावसात भिजून जा
कधी गडद धुक्यात न्हाऊन जा
लांब पारंब्यावर झुलत रहा
कधी झर्यातुन चालुन पहा
सुंदरता अजुनही माझ्यात आहे आहे
बस तुमच्या मदतीची साथ आहे
आजही देईल तीच गार हवा
किमान एक तरी झाड लावून पहा ....
किमान एक तरी झाड लावून पहा ......

**कु. सलोनी हरीप्रसाद अवस्थी**
बी.एस्सी. प्रथम वर्ष.



# चैत्राची पालवी ते फाल्गुनी रंग : गावाच्या आठवणीची शिदोरी...



कु. रेणुका संतोष मांदळे
बी.कॉम. प्रथम वर्ष

लहानपणी सण येणार म्हणटलं की, आमची लगबग असायची, अंगण सारवण्यापासुन ते घराच्या रंगरंगोटी पर्यंत सुरु व्हायची आजीने शेणाने सारवलेल्या त्या ओल्या अंगणाचा सुवास आजही माझ्या मनात दरवळतोय खरं तर, शहरात सण फक्त सोशल मीडियावर अपलोड करण्यासाठी करतात किंवा कॅलेंडरच्या तारखामध्ये येतात आणि जातात : पण माझ्या गावाकडे सण हा केवळ आकडयाचा किंवा तारखा नसुन तो वाऱ्याच्या सुगंधात मिसळलेला असतो. पहाटेचा तो थंडगार वारा, मंदिरातून येणारा मधुर घंटानाद, शेतातल्या कामाची लगबग आणि सणाच्यादिवशी घराघरातून दरवळणारा नैवेदयाचा सुवास-हिच तर आमच्या खऱ्या सणाची लक्षणे आहेत.

चैत्राच्या पालवी पासून सुरु झालेला हा सोहळा फाल्गुनात रंगाच्या उधळणीपर्यंत कसा अखंड चालतो, हे अनुभवणे म्हणजे एक विलक्षण पर्वणी असते. चला तर मग माझ्या गावच्या या मातीतल्या उत्सवांच्या आठवणींची शिदोरी उघडूया.

नव्या आशेची पहाट घेऊन येणारा वर्षाचा पहिला सण म्हणजे दारी उभारलेली 'गुढी' आमच्या घरी या दिवशी पहाटेच उठून सर्व आवरा आवर व्हायची. आई आणि मी मिळून दारा समोर गुढी भोवती मोठी आणि सुरेख रंगीत रांगोळी काढायचो. बाबा बांबूची काठी स्वच्छ धुवून त्याला साडी, कडुलिंबाची डहाळी आणि साखरेची गाठी, फुलांचा हार आणि कलश लावुन गुढी उभी करायचे तो क्षण खूप मंगलमय वाटायचा आजीच्या हाताची ती गरम-गरम पुरणपोळी आणि हरभऱ्याच्या डाळीच्या तिखट वरण म्हणजे साक्षात अमृतच! आजीच्या हाताची चव आणि घरातला तो आनंदी माहोल आजही डोळया समोर उभा राहतो.

चैत्राचा हा आनंद अनुभवत असतानाच वैशाखाचे आगमन होते. आमच्या घरी वैशाखातील 'अक्षय तृतीयेला' अनन्यसाधारण महत्त्व दिले जाते. या दिवशी केलेले दान अक्षय म्हणजे कधीही न संपणारे पुण्य देणारे असते. अशी आमची श्रध्दा आहे. त्याच बरोबर उन्हाळयाच्या सुट्टीत या सणाला मिळणारं थंडगार कैरीचं पन्हं आणि आंब्याचा रस म्हणजे आम्हा मुलांसाठी मेजवानी असायची. आंब्यासाठी आम्हा भावंडामध्ये होणारे भांडणे आणि पन्हं कोण जास्त पिते यासाठी केलेला वाद आज आठवून खूप हसायला येतं.

वैशाखाचा हा ऊन-सावल्यांचा खेळ अनुभवल्यानंतर ज्येष्ठ महिन्याची चाहूल लागते. ज्येष्ठ महिना म्हणाटलं की, निसर्ग आणि नात्यातील पावित्र्याची साक्ष देणारा सत्यवान आणि सावित्रिच्या कथेतील वटवृक्ष वटपोर्णिमा हा सण आमच्या गावातील बायकांसाठी खूप जिव्हाळयाचा सोहळा असतो. ज्येष्ठ महिना पावसाच्या आगमनाची ओढ लावतो, तर वटपोर्णिमा हा सण निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा उत्सव बनतो. नात्यातील प्रेमाची सावली देणाऱ्या वडाच्या झाडाची पुजा करताना आई आणि गावातील सुवासिंनीची श्राध्देने पुजा करत होत्या ते प्रत्यक्ष बघीतले, लहान असताना मी आई सोबत पुजेला जायची, सुरुवातीला हळद-कुंकू लावून एक कोरे वस्त्र वडाला अर्पण करायची आणि एखादे फळ असे की आंबा ठेवायची हात जोडून नमस्कार

केला की, पांढऱ्या दोऱ्याने वडाला सात प्रदक्षिणा घालायची. ही केवळ एक पुजा नसून पिढयान-पिढया चालत आलेला नात्यातील विश्वासाचा हा एक संस्कार आहे.

ज्येष्ठ संपताच आषाढाचे ढग दाटून येतात आणि आठवतो तो सर्वांचा लाडका सखा-पांडूरंग माझ्या गावी हा महिना एखाद्या मोठया उत्सवासारखा साजरा होतो. माझे आजोबा या दिवसाची आतुरतेने वाट पाहायचे, कारण आमच्रू गावातून पंढरीला पायी दिंडी निघायची. ''ज्ञानोबा-तुकाराम'' च्या गजरात आजोंबाच्या चेहऱ्यावर जी ऊर्जा असायची, ती शब्दांत मांडता येणार नाही. वारी हि खऱ्या अर्थाने महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. आजोबा वारीहून परत आल्यावर जेंव्हा तिथले अनुभव सांगायचे आणि विठ्ठलाचा प्रसाद दयायचे त्याच बरोबर आमच्यासाठी पंढरपुराहून माळ सुध्दा आणायचे. खर तर आज्या येणार म्हणटलं की, खूपच उत्सुकता लागून राहायची तो क्षण खरच खूप अविस्मरणीय होते. वारीचा हा सोहळा अनुभवल्या नंतर निसर्गाच्या हिरव्यागार सौंदर्यासाठी ओळखला जाणारा 'श्रावण' महिणा येतो. श्रावनात गावाकडचं रुप पूर्णपणे पालटून जातं.

सगळीकडे हिरवाईची शाल पाघरल्या सारखं वाटतं. त्यात शेतातल्या ऐखादया झाडाला बांधलेला नागपंचमीचा झोका पायंदुःखे पर्यंत खेळायचो आणि खेळता-खेळता भांडण सुध्दा करायचो की, मीच आणि खेळणार प्रत्येकजन आपल्या शेतात झोके बांधायचे व मी प्रत्येकाच्या शेतातील झोके खेळायला जायचे त्यानंतर प्रत्येक श्रावण सोमवारी महादेवाच्या मंदिरात सकाळीच बेलाचे पान ते सुध्दा एकशे आठ पान शंकराच्या पिंडीवर अर्पण कराचे मी आणि माझी बहीण व काही आमच्या मैत्रिणी प्रत्येक श्रावण सोमवारी जायचो. मन प्रसन्न व्हायचं.

श्रावण संपता संपता येतो तो बळीराजाचा सर्वात मोठा उत्सव, म्हणजे बैलपोळा, शेतात राबणाऱ्या बैलांना त्या दिवशी कसं सजवल जायचं, तर त्यांच्या खांदयाला हळद लावून, शिंगाला रंगवणे जायचे व त्याच्या शिंगाला काहीजन फुगे सुध्दा बांधायचे, अंगावर झुली टाकायची आणि या झुलीवर आकर्षक चित्रे, नक्षी शिवलेली असायची पायात घुंगर बांधले जायचेवर मारोतीच्या पारापासून त्यांची मिरवणूक काढली जायची. गावातील प्रत्येक घरी नेवून त्यांना नैवेदय खायला द्याचे व त्याच्या पायाधारी काकडी फोडून बैलांना ओवाळले जाते. हा दिवस वर्षभर बैलांनी शेतात केलेल्या कामा बद्दलची कृतज्ञता व्यक्त करतो.

त्यानंतर येणारा 'गणेशोत्सव' म्हणजे तर आमचा जीव की प्राण! बाप्पासाठी मखराची सजावट करण्यात आमचा अख्खांदिवस जायचा. सकाळ संध्याकाळ गणपतीची आरती व खुसखुशीत मोदक खर तर असं वाटायचं कधी आरती संपते आणि कधी मोदक खाऊ याच गणेश उत्सवात येतात तिन दिवसाच्या पाहूण्या त्या म्हणजे गौराई त्या दिवशी सुध्दा मखर तयार करण्यात अखखी रात्र जायची महालक्ष्म्याला साडया नेसवणे विविध अलंकाराने नटवणे, फराळाचे नैवेदय देणे व दुसऱ्या दिवशी अंबिल आणि अंबाडयाची भाजी पुरण पोळीचा नैवेदय विशेष माणला जातो. दारा पासून आत घरातल्या मखरापर्यंत हळद आणि कुंकवाचे हताचे पंजे उमटवले जातात आणि महालक्ष्मीची आरती घेतली जाते. गौरी गणपतीचा उत्सवाचा आनंद ओसरतो न ओसरतो तोच वेध लागायचे ते 'दसऱ्याचे' दसऱ्याच्या दिवशी आमच्या घरचे सर्वजण दसऱ्या महोत्सवात जायचे तिथे मोठं-मोठाले आकाश पाळने, विविध वस्तूचे दुकान असायचे आम्ही खूप खेळाचो आणि खरेदी सुध्दा करायचो. शेवटच्या दिवशी रावन दहन बघण्याची वेगळीच मज्जा असायची विजय दशमीला आपटयाची पानं म्हणजेच 'सोनं' घेऊन जेव्हा आम्ही गावातल्या

मोठया माणसांच्या पाया पडायला जायचो, तेंव्हा त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि त्यांनी दिलेले आशिर्वाद हीच आमची खरी श्रीमंती असायची. दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशी आम्हाला अजीबातच करमत नसे कारण, गावात होणारा दसरा महोत्सव संपतो तर घरात नऊ दिवस केलीली घटस्थापना सुध्दा विसर्जित होते. घटस्थापनेचा पहिल्या दिवशी एका मोठया परातीमध्ये माती घेतात आणि त्या पाच धान्य टाकतात परातीच्यामध्यभागी घट मांडतात आणि तुळजभवानीचा टाक त्या घटातल्या वाटीमध्ये तांदळात ठेवण्यात येतो. भोवतीला पाच नागीलीचे पान लावतात. पाच जोवारीचे धांडे लावतात. आणि सर्वांत महत्वांच म्हणजे आमच्या गावी मोठ मोठाल्या देवीच्या वेगवेगळया स्वरुपातील देवीच्या मूर्ती स्थापन केल्या जातात. नऊ दिवस आम्ही मुली गरबा खेळण्यासाठी देवीच्या मंडपात गोळा होतो. शेवटी खेळ होतात. जेवायला असतं, रांगोळी, गरबा, सजावट इत्यादी गोष्टी आम्ही नऊ दिवस खूप आवडीने करतो.

नवरात्री दसऱ्यानंतर वेध लागतात ते दिपोत्सवाचे म्हणजेच 'दिवाळीचे' दिवाळीचा एकच दिवस असतोः पण सुरुवात मात्र आठ दिवसापासून होते. दिवाळी येणारं म्हणटलं की फराळ आलाच, चकल्या, करंज्या, लाडू, चिवडा इ. फराळ तयार करण्यात आठ दिवस जायचे दिवाळीच्या आधल्या दिवशी उटणे लावून केलेले अभ्यंग स्नान संध्याकाळची तयारी झेंडूच्या फुलाचे तोरण करण्याची कामगीरी नेहमी मीच करायचे अंगणात सुरेख आणि दिवाळीची विशेष रांगोळी आई काढायची दारात दोन्ही बाजूंनी लावलेले दिवे खिडक्यात सुध्दा पणत्या लावायचो. लक्ष्मी पुजन विशेष असायचं. आम्ही सर्वांनी मिळून केलेला किल्लातर सर्वात वेगळांच असायचा कारण नेहमीच आम्ही काहीतरी नवीन करण्याचा प्रयत्न करायचो. किल्याला आकाशकंदिल आणि घराला सुध्दा आकाशकंदिल लावायचो. मुख्य म्हणजे फटाके फोडण्यात तर खूपच मज्जा यायची एक तर नवे कपडे आणि मित्र-मैत्रिणी सोबत सात-आठ वाजे पर्यंत फोडलेले फटाके खरचं हे क्षण आता फक्त आठवणीमध्ये जिवंत आहेत.

त्याच बरोबर संक्रांतीत थाटाचे वर्णन तर राहिले, संक्रातीला गावातील सुवासनीवाण घेवून म्हणजे की, ज्यात बोरं, ऊस, वटण्याच्या शेंगा, जांब इत्यादी पदार्थ एकत्रिकण म्हणजे ते 'वाण' घेवून विठ्ठल रुक्कमीच्या मंदिरात जातात आणि रुक्मीनीला वाण देवून तुळशीला वाण देतात व इतर पाच बायकांना उखाणा घेवून पदरामध्ये हे वाण टाकतात. आणि तिळ गूळ वाटतात व म्हणतात ''तिळ गुळ घ्या गोड-गोड बोला''. संक्रांतीला होणारी पंतगबाजी तर सकाळच्या १० वाजल्या पासून ते संध्याकाळच्या ६ वाजेपर्यंत चालूच असायचे.

वर्षाचा शेवट होतो तो मार्गशीर्ष महिन्यातील लक्ष्मी व्रताने आणि फाल्गुनातील 'होळीने' मार्गशिर्ष महिन्यातील दर गुरुवारी महालक्ष्मी व्रत असायच केळीचे पाच खांब चौरंगाला बांधून लक्ष्मीची मुर्ती मांडून व्रत करण्याची परंपरा आजही आम्ही पार पाडतो.

होळीचा तसाच थाट आमच्या गावी केला जातो, सर्व गावकरी मिळून शेणाच्या गोऱ्या, लाकडं, ऐरंडाचा खाणंटा, गाठी सर्व साहित्य जमा करुन चौकात मोठी होळी मांडायचे आणि गावातील बायका नैवेदय घेवून होळीच्या दर्शनासाठी येत. दुसऱ्या दिवशी रंगपंचमी रंगाची उधळण 'होळी रे होळी पुरणाची पोळी' म्हणत आम्ही सर्व मित्र मंडळ होळी खेळायचो. जुन्या वाईट विचारांची होळी करुन नव्या उर्जाने एकमेकांना रंगात न्हाऊन काढण्याचा तो सोहळा वर्षाच्रू प्रवासाचा एक सुखद शेवट असतो.

काळाच्या ओघात आज सर्व काही बदललंय गावाकडे आता सिमेंटची घरं झाली, अंगण सारवण्याची जागा आता टाइल्सनी घेतली पण आजही जेव्हा सण

येतो, तेव्हा मनाच्या कोपऱ्यात तो मातीचा सुगंध आणि संस्कारांची गुंफण तशीच घट्ट आहे. सण साजरे करण्याची पध्दती थोडया बदलल्या असतील पण त्यामागील माणुसकी आदर मात्र आजही माझ्या गावात अखंड टिकून आहे.

थोडक्यात सांगायचे तर, गावाच्या या मातीतल्या सणांनीच आम्हाला संस्कृतीची आणि खऱ्या नात्यांची ओळख करुन दिली. आज शहरात प्लॅटमध्ये राहताना आम्ही सण साजरे करतोः सोयी-सुविधा खूप असतीलही पण आजीच्या हाताची ती चव आणि अंगणातल्या त्या सारवलेल्या मातीचा सुवास आजही कुठे मिळत नाही.

हे सण म्हणजे केवळ धार्मिक विधी किंवा प्रथा नाहित, तर ते आपल्या जगण्याचा खरा श्वास आणि आपल्या अस्तित्वाचा आधार आहेत. आणि आपल्या आठवणींची शिदोरी आहे.

# जात्यावरच्या ओव्या

रक्तानं ग रंगलेला लाल बावटा
सुपा मंदी नाही दाणा
उपाशीच माझा कान्हा
राबतोय यांनी राणा
उपाशीच आठवण माझी लाल बावटा

रघु माझा शाळा जाई
अंगात ग आंगडं न्हाई
अंगाची ग होते ल्हाई
अंतरीची हाक देता लाल बावटा

धनिकांची सत्ता सगळी
रीत तिची दुनियेत आगळी
जिवे माणसारुनी चघळी
उलथवील सत्ता असली लाल बावटा

उठा बाई फाट झाली
साद कोंबड्यांची आली
सुर्यानं ग आणली लाली
त्योबी मानतो घ्या ग हाती
लाल बावटा

**कु. मयुरी दिलीपप्रसाद अवस्थी**
बि.ए. प्रथम वर्ष

# जात्यावरच्या ओव्या

सुंदर माझे जाते गं
फिरते बहुतेकी
ओव्या गावु कौतुकी
तु ये रं बा विठ्ठला

जिव आणि शीव खुंटी गं
प्रपंचाचे नाते ग
लावुनी पाची बोटे गं
तु येरं बा विठ्ठला

सासु आणि सासरा
दिला तो तिसरा
ओव्या गावु भ्रतारा
तु येरं बा विठ्ठला

बारा सोळा गडनी
अवघ्या कामीनी
ओव्या गावु बैसुनी
तु येरं बा विठ्ठला

**कु. मयुरी दिलीपप्रसाद अवस्थी**
बि.ए. प्रथम वर्ष

# त्यागाची मूर्ती आई 'रमाई'

कोणत्या शब्दात सांगू आई माझ्यासाठी कोण आहेस
तू भुकेल्या जीवाचा मायेचा घास तू वेदनेनंतरची
माझी पहिली हाक तू
आहेस माझा प्रगाड विश्वास तू
अन हृदयाच्या स्पंदानातील माझा प्रत्येक
श्वास तू :!!!
झुंजरक्या पहाटे किलबिलती बाग तू
आधी मधी रागात सूर्याची तळपती आग तू
अंधाराला हि दूर करणारा प्रकाश तू
माझी मायेची धरती अन छायेच आकाश तू :!!
मायेच्या पावसाचा ओलावा तू
जिवनी सुखाचा गारवा तू आई दुधरुपी
अमृताचा गोडवा तू अन
शेवटच्या क्षणापर्यंतचा
तुझ्या कुशीतील विसावा तू..!
डॉ. बाबासाहेबांच्या पाठीमागे
शांतपणे उभी राहिलेली शक्ती ??
माता रमाई - निस्वार्थ प्रेमाचा आदर्श ??

**शरद नरवाडे**
माजी विद्यार्थी

# वासुदेवाची स्वारी

वासुदेव आला हो वासुदेव आला
सुर्योदय झाला हो हरीनाम बोला
हरी नाम बोला तुम्ही हरी नाम बोला
सकाळच्या पहारी हरीनाम बोला
हरी नाम बोला तुम्ही हरी नाम बोला
पुजापाठ करता हरीनाम बोला
हरी नाम बोला तुम्ही हरी नाम बोला
मानव देह मिळाला हरीनाम बोला
हरी नाम बोला तुम्ही हरी नाम बोला
जन्माचे सार्थक होई हरीनाम बोला
हरीनाम बोला तुम्ही हरी नाम बोला
भगवंत कृपा होई हरीनाम बोला.
सकाळच्या पहारी आली वासुदेवाची स्वारी
माणसाच्या रुपात साक्षात भगवंत आले दारी
हरी गीत गात , कृष्णलीला वर्णत
अभंग गात सुंदर
देव येई अंगणात ....
पायघोळ अंगरखा
असे त्यावर विजार
टाळ चिपळ्या हातात
करीतोस लोकजागर .....
गळा कवडीच्या माळा
माथ्यावर शोभे अष्टगंध टीळा
हरी विठ्ठलाची भक्ती सांगणारा
भक्त असे हा साधा भोळा ....
असे हाच आमचा सांगता नाही येत
मध्य रात्र सकाळ - सकाळ
ऐकुनी देई जिवणाचे सारं ......

**कु. अनुराधा रमेश वाघ**
बि.ए. प्रथम वर्ष

# ग्रामसंस्कृती आणि भारतीय समाज

**प्रवीण सुधाकर खिल्लारी**
(पदव्युत्तर मराठी)द्वितीय वर्ष

ग्राम संस्कृती (Rural Culture) हे भारतीय समाजाचे अविभाज्य आणि मूलभूत अंग आहे.

ग्राम संस्कृतीचा मुख्य आधार शेती आहे. ग्रामस्थांचे संपूर्ण जीवनचक्र, सण-उत्सव आणि अर्थकारण पावसाळा आणि पिकांच्या हंगामावर अवलंबून असते. खेड्यांमध्ये लोक एकमेकांशी घट्ट नातेसंबंधांनी जोडलेले असतात. सुख-दुःखाच्या प्रसंगी संपूर्ण गाव एकत्र येते. ही 'आम्ही' पणाची भावना ग्राम संस्कृतीचे मुख्य वैशिष्ट्य आहे. ग्रामीण जीवन निसर्गाच्या सानिध्यात असते. झाडे, नद्या, डोंगर आणि पशू-पक्षी यांच्याबद्दल ग्रामस्थांच्या मनात कृतज्ञतेची भावना असते, जी त्यांच्या विविध लोककथा आणि गाण्यांमधून (उदा. ओव्या) व्यक्त होते. भारूड, कीर्तन, तमाशा, लावणी आणि विविध स्थानिक जत्रा यांतून ग्राम संस्कृतीचे दर्शन घडते. या कला केवळ मनोरंजनाचे साधन नसून त्यातून मूल्यशिक्षणही दिले जाते.

ग्रामीण भागातील लोकांचे राहणीमान साधे असते. पाहुण्यांचे स्वागत करणे आणि त्यांना प्रेमाने जेऊ घालणे ही ग्रामीण संस्कृतीची मोठी ओळख आहे.बैलपोळा, नागपंचमी, दिवाळी आणि स्थानिक ग्रामदैवतांच्या जत्रा हे सण मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. यात केवळ धार्मिक विधी नसून सामाजिक एकत्रिकरणाचा हेतू असतो.ग्राम संस्कृती म्हणजे मानवी मूल्ये, निसर्गप्रेम आणि परंपरेचा सुरेख संगम आहे

संस्कृती आणि लोकपरंपरा यांचा अत्यंत जवळचा आणि अतूट सहसंबंध आहे. लोकपरंपरा हा संस्कृतीचा मूळ गाभा मानला जातो, ज्यातून समाजाची ओळख आणि जीवनपद्धती स्पष्ट होते. संस्कृती ही एक व्यापक संकल्पना असून त्यात लोकांचे विचार, आचार आणि मूल्ये यांचा समावेश असतो. लोकपरंपरा (जसे की सण, उत्सव, लोककला) या संस्कृतीचे प्रत्यक्ष दर्शन घडवतात. लोकपरंपरा पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या असतात. लोकगीते, लोककथा आणि पारंपारिक नृत्यांच्या माध्यमातून संस्कृती जिवंत ठेवली जाते आणि पुढील पिढीकडे हस्तांतरित केली जाते.सण-उत्सव आणि सामूहिक लोकविधी यांसारख्या परंपरा लोकांना एकत्र आणतात. यामुळे समाजात एकोपा वाढतो, जी संस्कृतीची एक महत्त्वाची उपलब्धी आहे.

प्रत्येक प्रदेशाची संस्कृती तिथल्या लोकपरंपरांवरून ओळखली जाते. उदाहरणार्थ, महाराष्ट्राच्या संस्कृतीत लावणी, पोवाडा आणि लोक नृत्यासारख्या लोकपरंपरांना विशेष स्थान आहे.संस्कृती माणसाला जगण्याचा मार्ग दाखवते, तर लोकपरंपरा त्या मार्गावर चालण्यासाठी आवश्यक असलेले शिष्टाचार, नियम आणि कलात्मकता प्रदान करतात. म्हणूनच आजही ग्रामसंस्कृती सर्वश्रेष्ठ संस्कृती आहे.



# ऐतिहासिक हिंगोली

**राधा तारे**
(पदव्युत्तर मराठी)द्वितीय वर्ष

हिंगोली जिल्हा हा महाराष्ट्रच्या मराठवाडा विभागातील एक ऐतिहासिक धार्मिक आणि कृषीप्रधान जिल्हा आहे. १ मे १९९९ रोजी परभणी जिल्ह्यातून स्वतंत्र झाला या जिल्हात ५ तालुके आहेत. ५ तालुके असणारा हा महाराष्ट्रातील एकमेव जिल्हा आहे. हा जिल्हा आपल्या वैशिष्ट्यपूर्ण संस्कृतीमुळे महाराष्ट्राच्या वैभवात भर टाकतो.

**हिंगोली जिल्ह्याचे मुख्य वैभव :** औंढा नागनाथ मंदिर: हे हिंगोली जिल्ह्याचे सर्वात मोठे वैभव आहे. हे भारतातील १२ ज्योतिर्लिंगांपैकी आठवे ज्योतिर्लिंग मानले जाते. बारा ज्योतिर्लिंग हे भारतातील हिंदूंचे तीर्थक्षेत्र आहेत. त्यातील पाच महाराष्ट्रात आहेत. शतकानुशतके या ठिकाणी शिवांची पुजा केली जाते.औंढा नागनाथ हे त्यापैकी एक आहे. १२ ज्योतिर्लिंगांपैकी हे आठवे ज्योतिर्लिंग आहे. पांडवांनी अज्ञातवासात असताना हे मंदिर बांधल्याची आख्यायिका आहे. नागनाथ मंदिराला उत्तम कोरीव काम आहे. मंदिर हेमाडपंथी वास्तू शिल्प आहे आणि सुमारे साठ हजार चौरस फूट क्षेत्रावर आहे. शिवरात्री आणि विजयादशमी वर मोठ्या संख्येने यात्रेकरू या मंदिरात येतात.

**संत नामदेवांचे जन्मस्थान :-**

वारकरी संप्रदायाची पताका पंजाब पर्यंत पोहचविणारे मराठी संत नामदेव महाराज यांचे जन्मस्थान नरसी (बामणी) हे हिंगोली जिल्ह्यात आहे, जे वारकरी संप्रदायासाठी पवित्र तीर्थक्षेत्र आहे. नरसी मधील संत नामदेव मंदिराचा जीर्णोद्धार २०१९ झाला. नरसी मध्ये शीख गुरुद्वारा प्रसिद्ध आहे.

**सिध्देश्वर मंदिर :** हिंगोली जिल्ह्यातील औंढा तालुक्यात पुर्णा नदीवर सिध्देश्वर धरणाच्या परिसरात श्री क्षेत्र सिद्धनाथ महादेव मंदिर वसलेले आहे. हे स्थान गंगलवाडी येथे सिद्धगंगा आणि नागगंगा? नद्यांच्या संगमावर आहे. हे भगवान शिवाला सिद्धनाथ महादेव समर्पित प्राचीन मंदिर आहे.या परिसरात विविध प्रकारचे पक्षी आणि हिरवळ पाहायला मिळते. हे तालुक्यातील एक महत्त्वाचे आणि धार्मिक स्थळ आहे.

**कृषी क्षेत्र :** वेगळी ओळख निर्माण करणारा जिल्हा म्हणून हिंगोली ची ओळख आहे. जिल्ह्यातील हळद चांगल्या प्रकारे असून वसमत येथील बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्र या भागाच्या आर्थिक प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावत आहे.सोयाबीन , तूर, कापूस , ज्वारी आणि हरभरा ही या भागातील प्रमुख पिके आहेत. हिंगोली जिल्हा हा प्रामुख्याने कृषीप्रधान असून हळद उत्पादनासाठी राज्यात अग्रेसर आहे. हिंगोली जिल्हा हा हळदीचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो.

शैक्षणिक आणि वैज्ञानिक महत्त्व: या जिल्हात उच्च शिक्षण तांत्रिक शिक्षण आणि वैज्ञानिक संशोधनच्या क्षेत्रात लक्षणीय प्रगती होत आहे. यामध्ये प्रमुख महाविद्यालये इंजिनिअरिंग कॉलेज फार्मसी इन्स्टिट्यूट यासारख्या संस्था कार्यरत आहेत.

हिंगोली जिल्ह्यात लिगो इंडिया हा अत्यंत महत्त्वाचा वैज्ञानिक प्रकल्प उभारला जात आहे. जी एक अत्याधुनिक वैज्ञानिक प्रकल्प आहे.

**ऐतिहासिक वारसा :** हिंगोली जिल्हा हा मराठवाड्यातील एक ऐतिहासिक वारसा लाभलेला जिल्हा आहे. यामध्ये मल्लिनाथ दिगंबर जैन मंदिर, पेंशनपुरा, पलटन, जलेश्वर मंदिर, कानिफनाथ गड तोफखाना, निजामकालीन लष्करी तळ, अशा ऐतिहासिक भागांची नावे ऐकायला मिळतात.



# हिंदी विभाग

विद्यार्थी प्रतिनिधी

**दुर्गा अशोक शिंदे**
बी.ए. तृतीय वर्ष

**दिव्या बालाजी घुगे**
बी.ए. द्वितीय वर्ष

**अनिल त्र्यंबक टेकाळे**
बी.ए. प्रथम वर्ष

# किसान

धरती का वह सच्चा लाल,
मेहनत जिसका सबसे कमाल।
सुबह-सुबह जब सूरज आए,
किसान खेतों की राह पकड़े जाए।
कंधे पर हल, दिल में आस,
मेहनत ही उसका विश्वास।
बीज बोकर सपने सींचे,
पसीने से धरती को खींचे।
धूप जले या बरसे पानी,
न रुकती उसकी मेहनत कहानी।
आंधी आए या हो तूफान,
डटकर करता अपना काम।
मिट्टी से उसका गहरा नाता,
हर मौसम में साथ निभाता।

खेतों में जब हरियाली छाए,
मन उसका भी खुश हो जाए।
फसल उगे तो खुशियाँ लाए,
घर-आँगन में रौनक छाए।
पर कभी-कभी दुख भी आता,
जब मौसम साथ न निभाता।
कर्ज और चिंता का भार,
फिर भी चलता हर बार।
हिम्मत उसकी टूट न पाए,
हर मुश्किल से लड़ता जाए।
सादा जीवन, ऊँचे विचार,
यही किसान की पहचान।
खुद भूखा रहकर भी अक्सर,
सबका पेट भराता किसान।
धरती माँ का वह है दुलारा,
देश का सच्चा रखवाला।
उसके बिना सूना संसार,
वही है जीवन का आधार।
आओ मिलकर करें सम्मान,
उस मेहनती वीर किसान।
जिसके श्रम से जीवन चलता,
वही देश का सच्चा धन कहलाता।



**घुगे ओंकार**
बी.ए.प्रथम वर्ष

# गौ हित अनुसंधा : गौ संरक्षण, संवर्धन और राष्ट्र निर्माण की दिशा में एक समग्र चिंतन

**सौ.सरोज गट्टाणी**
एम.ए. हिंदी

भारत की संस्कृति, सभ्यता और जीवन-दर्शन में गौ माता का स्थान अत्यंत महत्वपूर्ण रहा है। प्राचीन काल से ही गाय को केवल एक पशु नहीं, बल्कि मातृत्व, करुणा, समृद्धि और लोककल्याण का प्रतीक माना गया है। भारतीय ऋषियों, मुनियों और महापुरुषों ने गौ सेवा को धर्म, अर्थ, काम और मोक्ष की साधना से जोड़ा है। यही कारण है कि भारत में गाय को गौ माता कहकर सम्मान दिया जाता है।

वेदों, पुराणों और स्मृतियों में गौ महिमा का विस्तार से वर्णन मिलता है। शास्त्रों में कहा गया है...

**सर्वेदेवाः स्थिता देहे, सर्वेतीर्थाः गवा मुखे।**

अर्थात् गौ के शरीर में समस्त देवताओं का निवास है और उसके मुख में सभी तीर्थों का वास है।

आज जब आधुनिकता और भौतिकता की दौड़ में मानवीय संवेदनाएं कमजोर होती जा रही हैं, तब गौ संरक्षण का विषय केवल धार्मिक आस्था तक सीमित नहीं रह जाता, बल्कि यह पर्यावरण संरक्षण, जैविक कृषि, ग्रामीण अर्थव्यवस्था, स्वास्थ्य और सांस्कृतिक अस्तित्व से भी जुड़ जाता है। इसलिए आवश्यक है कि हम गौ हित के विषय को भावनात्मक, सामाजिक, वैज्ञानिक और राष्ट्रीय दृष्टिकोण से समझें तथा इसके संरक्षण एवं संवर्धन हेतु सामूहिक प्रयास करें।

**गोवंश के प्रति श्रद्धा भाव कैसे जागृत हो?**

किसी भी वस्तु, व्यक्ति या परंपरा के प्रति श्रद्धा तभी उत्पन्न होती है जब उसके महत्व का सही ज्ञान समाज को प्राप्त हो। वर्तमान समय में नई पीढ़ी का एक बड़ा वर्ग गौ माता के सांस्कृतिक, धार्मिक और वैज्ञानिक महत्व से अनभिज्ञ होता जा रहा है। इसलिए सबसे पहले आवश्यक है कि गौ महिमा का व्यापक प्रचार-प्रसार किया जाए।

गाय केवल दूध देने वाला पशु नहीं है। उसका दूध, दही, घी, गोमूत्र और गोबर मानव जीवन के लिए अत्यंत उपयोगी हैं। पंचगव्य का उपयोग आयुर्वेद में औषधि के रूप में किया जाता है। गोबर से जैविक खाद, गोमूत्र से कीटनाशक तथा ऊर्जा उत्पादन तक के अनेक प्रयोग आज वैज्ञानिक रूप से प्रमाणित हो चुके हैं।

श्रद्धा जागृत करने के लिए निम्न प्रयास आवश्यक हैं

**शिक्षा के माध्यम से जागरूकता**

विद्यालयों, महाविद्यालयों और विश्वविद्यालयों में गोवंश के महत्व पर विशेष व्याख्यान, संगोष्ठियां और शोध कार्यक्रम आयोजित किए जाएं। विद्यार्थियों को गोशालाओं का भ्रमण कराया जाए ताकि वे गोसेवा का प्रत्यक्ष अनुभव प्राप्त कर सकें।

**धार्मिक एवं सांस्कृतिक कार्यक्रम**

मंदिरों, कथा-समारोहों, धार्मिक उत्सवों और सामाजिक आयोजनों में गौ महिमा पर प्रवचन और जागरण कार्यक्रम आयोजित किए जाएं। गोपाष्टमी, बजबारस और कृष्ण जन्माष्टमी जैसे पर्वों पर विशेष गोपूजन किया जाए।

**सामाजिक सम्मान**

जो व्यक्ति, संस्थाएं और गोशालाएं निस्वार्थ भाव से गोसेवा कर रही हैं, उन्हें समाज और सरकार द्वारा सम्मानित किया जाए। इससे अन्य लोग भी प्रेरित होंगे।

**मीडिया और तकनीक का उपयोग**

सोशल मीडिया, दूरदर्शन, रेडियो और डिजिटल प्लेटफार्मों के माध्यम से गौ संरक्षण के सकारात्मक संदेश प्रसारित किए जाएं। युवाओं को आधुनिक माध्यमों से जोड़कर गोसेवा की भावना विकसित की जाए।

**परिवार से संस्कार**

बच्चों में बचपन से ही जीवों के प्रति दया, करुणा और सेवा का भाव विकसित किया जाए। जब परिवार में गौ माता के प्रति सम्मान होगा, तब समाज में भी श्रद्धा स्वतः बढ़ेगी।

- आधुनिक बनो विचारों में, प्रगति करो पर संस्कारों में।
- रक्षा करो गौ माता संवर्धन में,मानव हो तो मानवता रहे व्यवहारों में।
- गौ माता के प्रति श्रद्धा का अर्थ केवल पूजा करना नहीं, बल्कि उनके संरक्षण और सेवा का संकल्प लेना भी है।

**गोवंश कैसे सुखी हो?**

गायों की सुख-समृद्धि केवल भावनात्मक विषय नहीं है, बल्कि यह हमारी जिम्मेदारी भी है। आज शहरों और गांवों में हजारों गायें सड़कों पर भटकती हुई दिखाई देती हैं। वे प्लास्टिक और कचरा खाने को मजबूर हैं, जिससे अनेक बीमारियां उत्पन्न होती हैं। यह स्थिति समाज की संवेदनहीनता का परिचायक है।

गोवंश को सुखी बनाने के लिए निम्न उपाय आवश्यक हैं...

**कचरा मुक्त वातावरण**

हर गली-मोहल्ले में यह सुनिश्चित किया जाए कि गायें कूड़े के ढेरों तक न पहुंचें। प्लास्टिक मुक्त अभियान चलाया जाए और कचरे का वैज्ञानिक प्रबंधन किया जाए।

**गोशालाओं का सुदृढ़ीकरण**

नगर निकायों, पंचायतों और सामाजिक संगठनों के सहयोग से आधुनिक गोशालाओं की स्थापना की जाए। वहां पर्याप्त चारा, पानी, आश्रय और चिकित्सा सुविधा उपलब्ध हो।

**चिकित्सा एवं टीकाकरण**

गोवंश के लिए नियमित स्वास्थ्य जांच, टीकाकरण और आपातकालीन पशु चिकित्सा सेवाएं उपलब्ध कराई जाएं। प्रत्येक जिले में पशु चिकित्सालयों की संख्या बढ़ाई जाए।

**चारा एवं जल व्यवस्था**

सूखे और अकाल की स्थिति में विशेष चारा बैंक स्थापित किए जाएं। गोशालाओं और गांवों में वर्षा जल संचयन तथा जल संरक्षण की व्यवस्था हो।

**गोद लेने की योजना**

समाज के संपन्न लोग और संस्थाएं एक या अधिक गायों को गोद लेने की परंपरा को अपनाएं। इससे गोशालाओं पर आर्थिक बोझ कम होगा।

**गोसेवा को जनआंदोलन बनाना**

धार्मिक आयोजनों, विवाह समारोहों और सामाजिक कार्यक्रमों में गोसेवा के लिए दान की व्यवस्था की जाए। चारा दान, जलदान और गोभोजन जैसी परंपराओं को प्रोत्साहित किया जाए।

**गौ माता प्राणी नहीं, संसार का प्राण है।**

**गौ माता केवल जानवर नहीं, भारत की जान है।**

जब समाज गाय को बोझ नहीं बल्कि धरोहर

मानेगा, तब गोवंश वास्तव में सुखी और सुरक्षित होगा।

**गोचर भूमि का संरक्षण कैसे हो?**

गोचर भूमि ग्रामीण भारत की जीवनरेखा है। यह वह भूमि है जहां परंपरागत रूप से गोवंश चरता है। दुर्भाग्यवश आज शहरीकरण, औद्योगीकरण और अतिक्रमण के कारण गोचर भूमि निरंतर घटती जा रही है। इसका सीधा प्रभाव गोवंश के स्वास्थ्य और कृषि व्यवस्था पर पड़ रहा है।

गोचर भूमि संरक्षण हेतु निम्न प्रयास आवश्यक हैं। पहचान और सीमांकन प्रत्येक राज्य सरकार अपनी गोचर भूमि का सर्वेक्षण कर उसका विधिवत सीमांकन करे। भूमि अभिलेखों में स्पष्ट रूप से उसका दर्ज होना आवश्यक है।

**अतिक्रमण मुक्त अभियान**

गोचर भूमि पर हो रहे अवैध कब्जों को हटाने के लिए विशेष अभियान चलाए जाएं। इसके लिए स्थानीय प्रशासन और ग्राम सभाओं को अधिकार दिए जाएं।

**चारा उत्पादन**

गोचर भूमि पर केवल चारे योग्य फसलें जैसे ज्वार, बाजरा, बरसीम, मकई और नेपियर घास उगाई जाएं। इससे पशुओं को पर्याप्त पोषण मिलेगा।

**सामुदायिक भागीदारी**

ग्राम पंचायतों, स्वयंसेवी संस्थाओं और सामाजिक संगठनों को गोचर भूमि विकास कार्यक्रमों में सहभागी बनाया जाए।

**पर्यावरण संरक्षण**

गोचर भूमि पर वृक्षारोपण, जल संरक्षण और जैव विविधता संरक्षण के कार्य किए जाएं। इससे पर्यावरण संतुलन भी बना रहेगा।

**सख्त कानूनी संरक्षण**

गोचर भूमि के संरक्षण हेतु कठोर कानून बनाए जाएं तथा उनके उल्लंघन पर कड़ी कार्रवाई की जाए। यदि गोचर भूमि सुरक्षित रहेगी तो गोवंश प्राकृतिक वातावरण में स्वस्थ रहेगा और ग्रामीण अर्थव्यवस्था भी मजबूत होगी।

**भारत में गौ हत्या कैसे बंद हो?**

गौ हत्या का विषय केवल धार्मिक भावना से नहीं, बल्कि सामाजिक संवेदनशीलता, सांस्कृतिक पहचान और पशु संरक्षण से भी जुड़ा हुआ है। इसके समाधान के लिए भावनात्मक नारों से अधिक व्यवहारिक और कानूनी प्रयासों की आवश्यकता है।

**प्रभावी कानून**

केंद्र और राज्य स्तर पर गौ संरक्षण संबंधी कानूनों का प्रभावी क्रियान्वयन सुनिश्चित किया जाए। जहां कानून हैं, वहां उनका कठोरता से पालन हो। अवैध तस्करी पर नियंत्रण गौ तस्करी रोकने के लिए सीमावर्ती क्षेत्रों और प्रमुख मार्गों पर निगरानी बढ़ाई जाए। आधुनिक तकनीक और विशेष निगरानी तंत्र विकसित किए जाएं।

**शीघ्र न्याय व्यवस्था**

गौ संरक्षण से जुड़े अपराधों की सुनवाई के लिए त्वरित न्याय प्रणाली विकसित की जाए ताकि दोषियों को समय पर दंड मिल सके।

**बूढ़ी और निराश्रित गायों की सुरक्षा**

गाय जब दूध देना बंद कर देती है तब उसे छोड़ देना अमानवीय है। ऐसी गायों के लिए विशेष आश्रय और संरक्षण योजनाएं बनाई जानी चाहिए।

**आर्थिक उपयोगिता बढ़ाना**

गोबर आधारित जैविक खाद, बायोगैस, प्राकृतिक खेती और गोमूत्र उत्पादों को बढ़ावा देकर गाय को आर्थिक रूप से उपयोगी बनाया जाए। जब

गोवंश आर्थिक दृष्टि से भी लाभकारी होगा, तब उसका संरक्षण स्वाभाविक रूप से बढ़ेगा।

**जनजागरण अभियान**

समाज में गोसेवा और गौ संरक्षण की भावना विकसित करने के लिए व्यापक जनजागरण अभियान चलाए जाएं। गोपाष्टमी और बजबारस जैसे पर्वों को बड़े स्तर पर मनाया जाए।

**गौ अनुसंधान की आवश्यकता**

वर्तमान युग विज्ञान और अनुसंधान का युग है। यदि हमें गौ संरक्षण को स्थायी और प्रभावी बनाना है तो गौ आधारित अनुसंधान को बढ़ावा देना होगा। गौमूत्र, गोबर, जैविक खेती, पंचगव्य चिकित्सा, बायोगैस, प्राकृतिक ऊर्जा और पर्यावरण संरक्षण के क्षेत्रों में निरंतर शोध किए जाएं। विश्वविद्यालयों और अनुसंधान संस्थानों में गौ विज्ञान केंद्र स्थापित किए जाएं।

आज दुनिया जैविक कृषि और प्राकृतिक जीवन शैली की ओर लौट रही है। ऐसे समय में भारतीय गोवंश विश्व को टिकाऊ विकास का मार्ग दिखा सकता है। इसलिए गौ अनुसंधान केवल धार्मिक विषय नहीं बल्कि भविष्य की आवश्यकता है।

गौ अनुसंधान, संरक्षण और संवर्धन केवल सरकारों का कार्य नहीं है। यह पूरे समाज की सामूहिक जिम्मेदारी है। जब तक जन-जन में गोसेवा की भावना विकसित नहीं होगी, तब तक कोई भी योजना पूर्ण सफलता प्राप्त नहीं कर सकती।

हमें बच्चों में संस्कार, युवाओं में जागरूकता और बुजुर्गों में अनुभव का समन्वय करते हुए एक व्यापक जनआंदोलन खड़ा करना होगा। शिक्षा, संस्कृति, विज्ञान, कृषि और पर्यावरण-सभी क्षेत्रों में गौ माता के महत्व को पुनः स्थापित करना समय की मांग है।

गौ माता भारतीय संस्कृति की आत्मा हैं। उनका संरक्षण केवल एक प्राणी की रक्षा नहीं, बल्कि हमारी सभ्यता, संस्कृति, पर्यावरण और मानवीय मूल्यों की रक्षा है।

- ✼ आओ हम सब मिल संकल्प करें,गौमाता संरक्षण की ध्वजा धरें।
- ✼ गौमाता की करके रक्षा,माँ भारती का मस्तक ऊँचा करें।
- ✼ जहाँ गौ माता का सम्मान होता है,<br>वहाँ समृद्धि, शांति और कल्याण का निवास होता है।
- ✼ गौ सेवा केवल धर्म नहीं, राष्ट्र निर्माण का महान अभियान होता है।

# ग्रामीण मुहावरे

**मस्के बालाजी बाजीराव**
बी.ए. प्रथम वर्ष

खेत रहना
**अर्थः** मेहनत बेकार जाना

हल चलाना
**अर्थः** काम शुरू करना

धान का पत्ता होना
**अर्थः** बहुत कमजोर होना

गाँव का सीधा-सादा
**अर्थः** भोला-भाला व्यक्ति

माटी में मिलना
**अर्थः** पूरी तरह नष्ट हो जाना

खून-पसीना एक करना
**अर्थः** बहुत मेहनत करना

नौ दो ग्यारह होना
**अर्थः** भाग जाना

दूध का जला छाछ भी फूँक-फूँक कर पीता है
**अर्थः** अनुभव के बाद सावधान रहना

ऊँट के मुँह में जीरा
**अर्थः** बहुत कम मात्रा होना

घर का भेदी लंका ढाए
**अर्थः** अपने ही व्यक्ति द्वारा नुकसान होना

# ग्रामीण संस्कृति

**शेळके अभिषेक राजेश**
बी.ए. तृतीय वर्ष

ग्रामीण संस्कृति का अर्थ है गाँवों में रहने वाले लोगों का जीवन-तरीका, उनकी परंपराएँ, रीति-रिवाज, भाषा, खान-पान, वेशभूषा और सामाजिक व्यवहार। भारत जैसे देश में ग्रामीण संस्कृति अत्यंत समृद्ध और विविधतापूर्ण है।

**१. ग्रामीण जीवन की विशेषताएँ :**

ग्रामीण जीवन सरल, प्राकृतिक और परंपराओं से जुड़ा होता है। यहाँ के लोग प्रकृति के करीब रहते हैं और उनका जीवन कृषि पर आधारित होता है।

**२. परंपराएँ और रीति-रिवाज :**

गाँवों में त्योहार, विवाह, जन्म आदि अवसरों पर विशेष रीति-रिवाज निभाए जाते हैं। जैसेड्ढ
शादी में लोकगीत और नृत्य, फसल कटाई पर उत्सव
धार्मिक मान्यताओं का पालन

**३. भाषा और बोली :**

ग्रामीण क्षेत्रों में अलग-अलग बोलियाँ बोली जाती हैं जैसे अवधी, भोजपुरी, ब्रज आदि। ये भाषाएँ लोक संस्कृति को जीवित रखती हैं।

**४. खान-पान :**

गाँवों का भोजन सरल और पौष्टिक होता है, रोटी, दाल, सब्जी, ताजा दूध, दही, घी, मौसमी फल और अनाज

**५. वेशभूषा :**

ग्रामीण लोग पारंपरिक कपड़े पहनते हैं पुरुष: धोती-कुर्ता महिलाएँ: साड़ी या घाघरा-चोली

**६. सामाजिक जीवन :**

गाँवों में आपसी सहयोग और भाईचारा अधिक होता है। लोग एक-दूसरे के सुख-दुख में साथ देते हैं।

**७. लोककला और लोकसाहित्य**

ग्रामीण संस्कृति में लोकगीत, लोकनृत्य, कहानियाँ और कथाएँ महत्वपूर्ण स्थान रखते हैं। ये पीढ़ी दर पीढ़ी आगे बढ़ते हैं।

**८. कृषि का महत्व**

कृषि ग्रामीण जीवन का आधार है। किसान खेती करके अपनी आजीविका चलाते हैं और देश की अर्थव्यवस्था में योगदान देते हैं।

---

# किसान

धरती का वह सच्चा सपूत,
मेहनत जिसकी सबसे अनमोल।
धूप-छाँव में काम करे,
कभी न माने कोई भी बोल।
अन्न उगाकर सबको खिलाए,
खुद सादा जीवन अपनाए।
ऐसा महान है किसान,
देश का वह सच्चा मान।

**कापसे मनिषा त्रंबक**
बी.ए. तृतीय वर्ष

# ग्रामीण त्योहार

**कोकाटे सुरज देविदास**
बी.ए. तृतीय वर्ष

ग्रामीण क्षेत्रों में त्योहारों का बहुत महत्वपूर्ण स्थान होता है। ये त्योहार प्रकृति, कृषि और परंपराओं से जुड़े होते हैं। गाँवों में त्योहार केवल धार्मिक नहीं बल्कि सामाजिक और सांस्कृतिक एकता का प्रतीक भी होते हैं ।

**१. कृषि से जुड़े त्योहार :**

- ✻ गाँवों में अधिकतर त्योहार खेती और मौसम पर आधारित होते हैं
- ✻ मकर संक्रांति - नई फसल आने की खुशी में मनाया जाता है
- ✻ बैसाखी - रबी फसल की कटाई का उत्सव
- ✻ पोंगल - दक्षिण भारत में फसल का प्रमुख त्योहार
- ✻ ओणम - केरल में फसल और समृद्धि का पर्व

**२. धार्मिक त्योहार :**

- ✻ ग्रामीण लोग धार्मिक त्योहारों को बड़े उत्साह से मनाते हैं
- ✻ दीवाली - रोशनी और खुशियों का पर्व
- ✻ होली - रंगों और भाईचारे का त्योहार
- ✻ दशहरा - बुराई पर अच्छाई की जीत
- ✻ नवरात्रि - देवी पूजा का पर्व

**३. लोक त्योहार :**

- ✻ कुछ त्योहार खास ग्रामीण परंपराओं से जुड़े होते हैं गाँव के मेले (जत्रा) पशु मेले और हाट लोकनृत्य और लोकगीतों के आयोजन

**४. त्योहार मनाने का तरीका :**

- ✻ घरों की सफाई और सजावट
- ✻ पारंपरिक भोजन बनाना
- ✻ नए कपड़े पहनना
- ✻ पूजा-पाठ और सामूहिक कार्यक्रम

**५. सामाजिक महत्व**

ग्रामीण त्योहार लोगों को एक साथ लाते हैं। इससे आपसी प्रेम और सहयोग बढ़ता है। परंपराएँ जीवित रहती हैं। सांस्कृतिक पहचान मजबूत होती है।

# मेरा गाँव

भक्ती गजानन वलेकर - बी. ए. उपांत्य

मिट्टी की खुशबू, हवा सुहानी,
याद दिलाए हर इक कहानी।
हरे-भरे खेत, नदिया का किनारा,
गाँव है मेरा सबसे प्यारा।
गायों की घंटी, चिड़ियों का गान,
सुबह-सुबह लगता है मानो स्वर्ग समान।
सादा जीवन, खुशियों का ठिकाना,
मेरा गाँव है सबसे निराला।

**कुंदर्गे प्रतिज्ञा उध्दवराव**
बी.ए. तृतीय वर्ष

# ग्रामीण जीवन

**कुंदर्गे प्रतिज्ञा उध्दवराव**
बी.ए. तृतीय वर्ष

ग्रामीण जीवन का अर्थ है गाँवों में रहने वाले लोगों का जीवन। यह जीवन प्रकृति के करीब, सरल और शांत होता है। भारत की अधिकांश जनसंख्या आज भी गाँवों में निवास करती है, इसलिए ग्रामीण जीवन देश की पहचान का महत्वपूर्ण हिस्सा है।

**१. ग्रामीण जीवन की विशेषताएँ :**

ग्रामीण जीवन सादगी और प्राकृतिक वातावरण से भरपूर होता है। यहाँ स्वच्छ हवा और हरियाली होती है। जीवन धीमा और शांत होता है। लोग प्रकृति पर निर्भर रहते हैं।

**२. मुख्य व्यवसाय :**

गाँवों में लोगों का मुख्य व्यवसाय कृषि होता है

खेती (गेहूँ, चावल, दालें), पशुपालन (गाय, भैंस, बकरी), छोटे घरेलू उद्योग

**३. सामाजिक जीवन :**

ग्रामीण समाज में आपसी सहयोग और भाईचारा होता है। लोग एक-दूसरे की मदद करते हैं। सुख-दुख में साथ रहते हैं। परिवार और रिश्तों का महत्व अधिक होता है

**४. रहन-सहन :**

साधारण घर (कच्चे या पक्के), सादा और पौष्टिक भोजन, पारंपरिक वेशभूषा

**५. शिक्षा और स्वास्थ्य :**

गाँवों में शिक्षा और स्वास्थ्य सुविधाएँ कभी-कभी सीमित होती हैं। लेकिन धीरे-धीरे सुधार हो रहा है।

**६. संस्कृति और परंपराएँ :**

ग्रामीण जीवन परंपराओं से जुड़ा होता है। लोकगीत, लोकनृत्य त्योहार और मेले, धार्मिक विश्वास

**७. चुनौतियाँ :**

रोजगार की कमी, शिक्षा और स्वास्थ्य की कमी

आधुनिक सुविधाओं का अभाव ।

---

# गाँव की सुबह

सूरज निकला, फैली रोशनी,
खेतों में छाई हरियाली।
पंछी गाते मीठे गीत,
जाग उठा फिर सारा गाँव।
हल चलाते किसान खेत में,
पसीने से सींचे धरती माँ।
मेहनत से ही जीवन चलता,
यही सिखाता गाँव हमें।

**मोरे अमृता मनोहर**
बी.ए. द्वितीय वर्ष

# हल

**१३)** तोष्णीवाल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील खेळाडुने आंतर महाविद्यालयीन सेंटर झोन तलवार बाजी सायबर क्रिडा प्रकारात दि.१३/०८/२०२५ रोजी जयक्रांती महाविद्यालय लातुर येथे कदम बजरंग लिंबाजी या खेळाडुने तृतीय क्रमांक प्राप्त केला. व आंतर विद्यापीठ स्पर्धेत गुरुनानक देव विद्यापीठ अमृतसर येथे विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व केले आहे.

१४) तोष्णीवाल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सेनगांव च्या खेळाडुने आंतर महाविद्यालयीन सेंटर झोन आंतर विभागीय तायक्वांदो क्रिडा स्पर्धेत दि.१२/०९/२०२५ रोजी प्रतिभा निकेतन महाविद्यालय नांदेड येथे कदम बजरंग लिंबाजी याने सहभाग घेतला.

**१५)** तोष्णीवाल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सेनगांव च्या खेळाडु रुपाली वसंत शिंदे हिने ५३ किग्रॅ वजन गटात कुरुक्षेत्र विद्यापीठ कुरुक्षेत्र येथे विद्यापीठाचे प्रतिनीधीत्व केले.

**१६)** तोष्णीवाल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सेनगांव येथे २१ जुन २०२५ रोजी योग दिन साजरा करण्यात आला.

**१७)** तोष्णीवाल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सेनगांव येथे दि.२९ ऑगस्ट २०२५ रोजी राष्ट्रीय क्रिडा दिन साजरा करण्यात आला.

**१८)** तोष्णीवाल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सेनगांव येथे आंतर महाविद्यालयीन ड झोन क्रिकेट मुर्लीच्या क्रिडा स्पर्धा घेण्यात आल्या.

**१९)** तोष्णीवाल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सेनगांव येथे आंतर महाविद्यालयीन ड झोन क्रिकेट मुर्लींच्या कोचींग कॅम्प घेण्यात आला.

## कनिष्ठ महाविद्यालय

**१)** तोष्णीवाल महाविद्यालयातील ज्युनिअर खेळाडुने तालुकास्तरीय क्रिकेट स्पर्धेत १९ वर्ष मुले च्या संघाने सहभाग घेतला दि.२४/०९/२०२५ रोजी स्पर्धा घेण्यात आल्या.

**२)** तोष्णीवाल महाविद्यालयीन ज्युनिअर खेळाडुंनी तालुकास्तरीय क्रिकेट स्पर्धेत १९ वर्ष मुली च्या संघाने प्रथम क्रमांक प्राप्त केला जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड या स्पर्धा दि.१०/०९/२०२५ रोजी घेण्यात आल्या

१) जान्हवी पांडुरंग राहाटे
२) पुजा गंगाधर निमळे
३) मयुरी राहुल घावे
४) अनुष्का योगेश मिटकर
५) कापसे सायली दिलीप
६) पाईकराव नेहा यशवंत
७) झाडे दुर्गा महादेव
८) शिर्के दिव्या गजानन
९) कांबळे शितल महेंद्र

१०) लव्हांडे धनश्री सचिन
११) घोशिर पुष्पा नवनाथ
१२) अंजली अनिल राठोड
१३) रुक्मीणी भागवन घनमोडे
यांनी स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त केला.

**३)** तोष्णीवाल महाविद्यालयातील जिल्हास्तरीय मुलीचे क्रिकेट चा संघ जवळाबाजार येथे दि.१५ ऑक्टोंबर २०२५ रोजी १९ वर्ष वयोगट मध्ये जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त केला.

**४)** तोष्णीवाल महाविद्यालयातील विभागीय मुलींच्या क्रिकेट चा संघ संभाजीनगर येथे दि.१७/११/२०२५ रोजी विभागीय क्रिकेट स्पर्धेत मुलींच्या संघाने सहभाग घेतला.

**५)** तोष्णीवाल महाविद्यालयातील ज्युनिअर च्या खेळाडुने तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत दि.११/०९/२०२५ रोजी १) लक्ष्मण वसंता शिंदे ५७ किग्रॅ वजन गटात प्रथम क्रमांक प्राप्त केला. २) राजेश साईनाथ जाधव ८० किग्रॅ वजन गटात प्रथम क्रमांक प्राप्त केला.

**६)** तोष्णीवाल महाविद्यालयातील ज्युनिअर च्या खेळाडुने जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत १) लक्ष्मण वसंता शिंदे ५७ किग्रॅ वजन गटात प्रथम क्रमांक प्राप्त केला. २) राजेश साईनाथ जाधव ८० किग्रॅ वजन गटात प्रथम क्रमांक प्राप्त केला.

**७)** तोष्णीवाल महाविद्यालयातील ज्युनिअरच्या खेळाडुने १) लक्ष्मण वसंता शिंदे ५७ किग्रॅ वजन गटात २) राजेश साईनाथ जाधव ८० किग्रॅ वजन गटात दि.०७/१०/२०२५ रोजी विभागीय कुस्ती स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील खेळाडुने सहभाग घेतला.

**८)** तोष्णीवाल महाविद्यालयातील ज्युनिअर मुलांच्या खेळाडुने दि.२२/०९/२०२५ रोजी तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत सर्वोदय विद्यालय खुडज येथे सहभाग घेतला.

**९)** तोष्णीवाल महाविद्यालय ज्युनिअरच्या खेळाडुने ८-९ २०२५ रोजी तोष्णीवाल महाविद्यालयात तालुकास्तरीय मैदानी स्पर्धा घेण्यात आल्या

१) नागेश दामोधर ढोकर
४०० मि.हड्‌र्ल्स प्रथम
२) ज्ञानेश्वर बालाजी डाळ
१५०० मि.धावणे व्दितीय
३) नामदेव पांडुरंग उफाड
१०० मि.धावणे व्दितीय
४) नागेश दामोधर ढोकर
११० मि.हड्‌र्ल्स प्रथम
५) नागेश दामोधर ढोकर
२०० मि.धावणे व्दितीय
६) संजय जनार्धन गरपाळ
१५०० मि.धावणे प्रथम
७) नामदेव पांडुरंग उफाड
४ नब १०० रिले प्रथम
८) संजय जनार्धद गरपाळ
४ नब १०० रिले प्रथम
९) ज्ञानेश्वर बालाजी डाळ
४ नब १०० रिले प्रथम
१०) साईनाथ शिवलिंग उफाड
४ नब १०० रिले प्रथम
११) नेहा यशवंत पाईकराव
१०० मि.धावणे प्रथम
१२) नेहा यशवंत पाईकराव
२०० मि.धावणे प्रथम
१३) ज्ञानेश्वर बालाजी डाळ
१५०० मि.धावणे व्दितीय

१०) तोष्णीवाल महाविद्यालयातील ज्युनिअर च्या खळाडुने जिल्हास्तरीय स्पर्धेत खालिल खेळाडुंनी यश संपादन केले.

१) नागेश दामोधर ढोकर
४०० मि.हड्ल्र्स प्रथम

२) नागेश दामोधर ढोकर
११० मि.हड्ल्र्स प्रथम

३) ज्ञानेश्वर बालाजी डाळ
१५०० मि.धावण व्दितीय

४) नामदेव पांडुरंग उफाड
४ नब १०० रिले प्रथम

५) संजय जनार्धद गरपाळ
४ नब १०० रिले प्रथम

६) ज्ञानेश्वर बालाजी डाळ
४ नब १०० रिले प्रथम

७) साईनाथ शिवलिंग उफाड
४ नब १०० रिले प्रथम






**११)** तोष्णीवाल महाविद्यालय ज्युनिअर च्या खेळाडुनी मैदानी स्पर्धेत के.के.एम.महाविद्यालय मानवत येथे विभागीय स्पर्धेसाठी सहभाग नोंदविला.

**१२)** तोष्णीवाल महाविद्यालयाच्या क्रिडांगणावर तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेचे १४, १७, १९ वर्ष वयोगट मुले व मुली च्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

**१३)** तोष्णीवाल महाविद्यालयाच्या क्रिडांगणावर तालुकास्तरीय क्रिकेट स्पर्धेचे १४, १७, १९ वर्ष वयोगट मुले व मुली च्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

**लोकमत**

# मुलींच्या क्रिकेटच्या संघाने मारली बाजी

लोकमत न्यूज नेटवर्क

**सेनगाव :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व तालुका क्रीडा अधिकारी कार्यालय सेनगावच्या संयुक्त विद्यमाने तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मुलींच्या क्रिकेट स्पर्धा घेण्यात आल्या. यात तालुक्यातील अनेक शाळांनी सहभाग नोंदविला.

स्पर्धेमध्ये क्रिकेट संघाने बाजी मारली. संघामध्ये जान्हवी रहाटे, रुक्मिणी घनमोडे, मयुरी धाबे, दुर्गा झाडे, सायली कापसे, पूजा निर्मळ, धनश्री लव्हांडे, दिव्या शिरके, शीतल कांबळे, नेहा पाईकराव, अनुष्का मिटकर, पुष्पा घोशिर यांनी उत्कृष्ट सांघिक कामगिरी बजावत आश्रम शाळा बाभूळगावच्या संघास हरवून यश संपादन केले.

**क्रिकेट स्पर्धेत सेनगाव तालुक्यातील शाळांची घेतला होता सहभाग**

यशाबद्दल संस्थाध्यक्ष बी. आर. तोष्णीवाल, सचिव यू. एम. शेळके, उपाध्यक्ष सुभाष एकशिंगे, महाविद्यालय विकास समिती अध्यक्ष रमण तोष्णीवाल, प्राचार्य डॉ. एस. जी. तळणीकर आदींनी गुणवंतांचा सत्कार केला. क्रीडा विभाग प्रमुख डॉ. हेमंत शिंदे यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले.

Hello Hingoli
Page No. 3 Sep 13, 2025
Powered by: erelego.com

















# क्विक Update



## 'तोष्णीवाल'च्या खेळाडूचे कुस्ती स्पर्धेत यश

सेनगाव : येथील तोष्णीवाल महाविद्यालयातील खेळाडू महेश वाकडे याने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, नूतन महाविद्यालय सेलू यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'ड-झोन' कुस्ती स्पर्धेमध्ये ५७ किलो वजन गटात द्वितीय, तर 'सेंट्रल झोन' कुस्ती स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळविला. यशाबद्दल महाविद्यालयात त्याचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थाध्यक्ष बी. आर. तोष्णीवाल, यू. एम. शेळके, सुभाष एकशिंगे, रमण तोष्णीवाल, प्राचार्य डॉ. एस. जी. तळणीकर, क्रीडा विभागप्रमुख डॉ. हेमंत शिंदे, आदी उपस्थित होते.

**दैनिक भास्कर**

## खेलकूद स्पर्धा में तोष्णीवाल कॉलेज की सफलता



हिंगोली | सेनगांव शहर में स्थित तोष्नीवाल कॉलेज में तहसीलस्तरीय खेलकूद प्रतियोगिता का आयोजन किया गया। इस प्रतियोगिता में तोष्नीवाल महाविद्यालय के छात्र नागेश धोकर ने 400 मीटर बाधा दौड़ में प्रथम, ज्ञानेश्वर दल ने 1500 मीटर दौड़ में द्वितीय, नामदेव उफाड ने 100 मीटर और 400 मीटर दौड में द्वितीय, संजय गरपाल ने 1500 मीटर दौड़ में प्रथम, नागेश धोकर ने 110 मीटर बाधा दौड़ में प्रथम तथा ज्ञानेश्वर दल, नामदेव उफाड़, संजय गरपाल, साईनाथ उफाड़ ने 4 गुणा 100 रिले मे प्रथम तथा महिला वर्ग में नेहा पैकराव ने 100 मीटर और 200 मीटर दौड़ में प्रथम स्थान प्राप्त कर शानदार सफलता प्राप्त की। संस्था अध्यक्ष बी.आर. तोष्नीवाल, सचिव यू.एम. शेलके, [illegible] एकशिंगे, महाविद्यालय [illegible] अध्यक्ष रमन तोष्नीवाल [illegible] तलनीकर के साथ-साथ [illegible] शिक्षण कर्मचारियों ने ब[illegible]

## तोष्णीवाल महाविद्यालयीन खेळाडूंचे कुस्ती स्पर्धेत यश



सेनगाव - क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हा क्रीडा संकुल, हिंगोली येथे कुस्ती स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले होते.

सदर स्पर्धेमध्ये तोष्णीवाल महाविद्यालयातील विद्यार्थी साईनाथ राजेश जाधव ८० किलो वजन गट व १७ वर्ष वयोगटात फ्री स्टाईल कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक व लक्ष्मण [illegible] शिंदे ५७ किलो वजन व १९ वर्ष वयोगटात प्रथम क्रमांक पटकावत विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. त्यांच्या यशाबद्दल संस्थाध्यक्ष बी. आर. तोष्णीवाल, सचिव यु. एम. शेळके, उपाध्यक्ष सुभाषअप्पा एकशिंगे, महाविद्यालय विकास समिती अध्यक्ष रमण तोष्णीवाल, प्राचार्य डॉ.एस. जी.तळणीकर तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

**लढणारा कलमवीर**

## सेनगाव तोष्णीवाल महाविद्यालयाचा कबड्डी संघ उपविजेता–खेळाडूंच्या कामगिरीचे कौतुक

सेनगाव । विश्वनाथ देशमुख

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि योगानंद महाविद्यालय, वसमत यांच्या संयुक्त विद्यमाने आंतर-महाविद्यालयीन 'ड' झोन कबड्डी स्पर्धा योगानंद महाविद्यालय, वसमत येथे उत्साहात पार पडली. हिंगोली व परभणी जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांच्या संघांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.



या स्पर्धेत सेनगाव येथील तोष्णीवाल महाविद्यालयाच्या कबड्डी संघ दमदार खेळ करीत द्वितीय क्रमांक पटकावून उपविजेतेपदाचा मान पटकावला. संघात आदित्य तायडे, सुशांत शेळके, निलेश शेळके, सचिन शिंदे, धम्मदीप मस्के, अनिकेत तायडे, स्वप्निल जाधव, ओमकार गाढवे, कल्पेश जाधव, प्रभाकर वाणी व ऋषिकेश शिळके या खेळाडूंनी उल्लेखनीय खेळ केला. खेळाडूंच्या या यशाबद्दल संस्थाध्यक्ष बी. आर. तोष्णीवाल, सचिव यु. एम. शेळके, उपाध्यक्ष सुभाष अप्पा एकशिंगे, महाविद्यालय विकास समिती अध्यक्ष रमणजी तोष्णीवाल, प्राचार्य डॉ. एस. जी. तळणीकर, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले. या संघाला क्रीडा विभाग प्रमुख डॉ. हेमंत शिंदे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. खेळाडूंच्या शिस्तबद्ध खेळामुळे तोष्णीवाल महाविद्यालयाने पुन्हा एकदा आपले क्रीडा वर्चस्व सिद्ध केले आहे.

**लढणारा कलमवीर**

## तोष्णीवाल महाविद्यालयातील मुलींच्या क्रिकेटच्या संघाने मारली बाजी

सेनगाव । विश्वनाथ देशमुख

क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय हिंगोली व तालुका क्रीडा अधिकारी कार्यालय, सेनगाव यांच्या संयुक्त विधमाने आयोजित तोष्णीवाल कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,सेनगाव येथे मुलींच्या क्रिकेट स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले होते.यामध्ये तोष्णीवाल महाविद्यालयातील मुलींच्या क्रिकेट संघाने बाजी मारली. सदर स्पर्धेमध्ये तालुक्यातील अनेक शाळांनी उत्स्फूर्त असा प्रतिसाद देत सहभाग नोंदविला होता.सदर स्पर्धेमध्ये मागील वर्षाची परंपरा कायम ठेवत तोष्णीवाल महाविद्यालयातील महिला क्रिकेट संघाने बाजी मारली. या



संघामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थी जान्हवी रहाटे,रुक्मिणी घनमोडे,मयुरी धाबे,दुर्गा झाडे, सायली कापसे,पुजा निर्मळ, धनश्री लव्हांडे,दिव्या शिरके, शितल कांबळे,नेहा पाईकराव, अनुष्का मिटकर,पुष्पा घोशिर यांनी उत्कृष्ट सांघिक कामगिरी बजावत आश्रम शाळा बाभुळगाव यांच्या संघास हरवुन सदर यश संपादन केले.त्यांच्या सदर यशाबद्दल संस्थाध्यक्ष श्री.बी.आर.तोष्णीवालसचिव श्री.यु.एम.शेळके,उपाध्यक्ष श्री. सुभाषअप्पा एकशिंगे, महाविद्यालय विकास समिती अध्यक्ष श्री रमणजी तोष्णीवाल, प्राचार्य डॉ.एस.जी.तळणीकर तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले. क्रीडा विभाग प्रमुख डॉ.हेमंत शिंदे यांनी सदर खेळाडूंना मार्गदर्शन केले.

www.dainikkalmveer.in
12 Sep 2025 - Page 4

**मराठवाडा नेता**

Tue 05 Aug 25



## तोष्णीवालच्या खेळाडूचे बुद्धिबळ स्पर्धेत यश

सेनगाव - स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड व श्री शिवाजी महाविद्यालय, कंधार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सेंटर झोन बुद्धिबळ स्पर्धेमध्ये शेंनगाव येथील तोष्णीवाल महाविद्यालयाने घवघवीत यश संपादन केले आहे.

सदर स्पर्धेमध्ये महाविद्यालयीन खेळाडू अभय सुरेश अन्नपूर्णे याने तृतीय क्रमांक पटकावत विद्यापीठांतर्गत निवडल्या जाणाऱ्या कोचिंग कॅम्प मध्ये आपले स्थान निश्चित केले आहे.

त्याच्या सदर यशाबद्दल संस्थाध्यक्ष बी. आर.तोष्णीवाल यू.एम.शेळके, सुभाषअप्पा एकशिंगे, महाविद्यालय विकास समिती अध्यक्ष रमण तोष्णीवाल, प्राचार्य डॉ. श्रीपाद तळणीकर तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले. क्रीडा विभाग प्रमुख डॉ. हेमंत शिंदे यांनी सदर खेळाडूला मार्गदर्शन केले.

Tue 05 Aug 25 | Page: 4 | www.emarathwadaneta.com
Powered by Ashvamedh Software - 9975208920

**लोकमत**

ंबर २०२५

## गुणवंत खेळाडूंचा सत्कार



सेनगाव येथील तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने क्रिकेट स्पर्धेत यश मिळविले. याबद्दल गुणवंत खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. यावेळी शिक्षकवृंद, गुणवंत खेळाडू.

Hello Hingoli
Page No. 3 Sep 13, 2025
Powered by: erelego.com

# Student Mentor Scheme

| Dr. Datta Sawant | Mr. Dinesh Thorat | Dr. Arvind Naik |
|---|---|---|
| (Co-ordinator) | (Assistant Co-ordinator) | (Assistant Co-ordinator) |

The Student Mentor Committee, one of the active committees always engaged in various programmes and activities throughout the year. It is comprised of four persons including Dr. D.G. Sawant (Coordinator), Dr. A.P. Naik (Co-coordinator), Mr. D.D. Thorat (Co-coordinator) and Mr. U.H. Patil (Member). The committee is responsible to draw various notices, organise activities and programmes, discussions, etc. during the academic year. The following activities are conducted by the committee:

**Notices Drawn:**

| Date | Purpose of Notice |
|---|---|
| 03/07/2025 | Regarding to call students to attend regular classes |
| 08/01/2025 | Regarding to organise a meeting for regular classes and student attendance |
| 19/08/2025 | Second round of student allocation and list distribution |
| 21/08/2025 | Organisation of Teacher Awareness Programme |
| 23/08/2025 | “Har Ghar Shikshak” Campaign and Zone Distribution (by IQAC) |
| 03/09/2025 | Review meeting on “Har Ghar Shikshak” Campaign |
| 19/09/2025 | Distribution of final list of student allocation, filling examination forms and internal exams |
| 01/10/2025 | Extension of date of examination form submission |
| 10/11/2025 | Winter University Examination, EBC and GOI forms filling |
| 13/02/2026 | Filling of summer examination forms |
| 16/02/2026 | Meeting regarding summer exam forms |
| 27/02/2025 | Filling of examination forms who haven’t submitted yet |
| 28/03/2025 | Summer University Examination |

**Meetings and Discussions Held:**

1. A meeting held on 09/07/2025 regarding student attendance for regular classes at Principal's cabin in which discussion held on student distribution who have forwarded to the next classes, second year CBCS pattern students, class attendance, second and third year admissions and sign of mentors on the admission form. Two forms prepared for students' record.
2. Second meeting held on 23/08/2025 in the auditorium regarding "Har Ghar Shikshak" Campaign, zone distribution and planning.
3. Another meeting held on 03/09/2025 in the auditorium regarding the review of the scheme "Har Ghar Shikshak" campaign.
4. Meeting held on 16/02/2025 regarding summer examination form submission at Principal's cabin where remaining students traced out and responsibility of filling the forms fixed on concerned mentors.

**Programmes and Activities:**

1. Teacher Awareness Programme: the programme is organised on 22/08/2025 in the Auditorium. Principal Dr. S.G. Talnikar presided over the programme as the chairman, Dr. R.A. Joshi (Coordinator, IQAC), Dr. D.G. Sawant (Coordinator of the Committee), Dr. A.P. Naik (Co-coordinator) and Mr. D.D. Thorat (Co-coordinator) were present on the stage. The primary aim of the programme was how to attract students for regular classes. And based on it the discussion held and conclusions drawn. It was decided to run a campaign called "Har Ghar Shikshak" teacher at students' home and planning was made accordingly.

**2."Har Ghar Shikshak" (Teacher at Students' Home):** On the backdrop of work of this committee, it is found that the regularity/ presentee of students in the classroom and college has been dropped considerably, especially after COVID-19 pandemic.To tackle this grim issue in the region, the committee has decided to work on the problem of irregularity of students. It has organised and carried out the School Connect Programmes during last five years under which various junior colleges and schools had been visited, and carried out awareness drives. However, this year, that is 2025-2026, the committee decided to run a mega-campaign called Har Ghar Shikshak-Teacher at Students' Home.The full report is prepared separately.

**3.Attended a Workshop on Irregularity of Students:** Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded in collaboration with Baharji Smarak Mahavidyalay, Wasmat organised a workshop on Irregularity of Students in the Classrooms on 10/03/2026 at Wasmat. The workshop was attended by Dr. D.G. Sawant (Coordinator of the Committee), Dr. R.S. Gore (Head, Department of English) with four students. Dr. Sawant has made a presentation on "Har Ghar Shikshak" campaign whereas other took active participation in the workshop. The major points discussed in the workshop were: technology upgradation, lack of proper infrastructure, practicals are not conducted seriously, mother at college programme/

campaign, skillcourses through university, week end discussion on a literary work, timetable is a complex thing should be elastic, etc.

**Snapshots:**











# राष्ट्रीय सेवा योजना

**डॉ. राजाभाऊ नवगणकर**
(कार्यक्रमाधिकारी)
**डॉ. गोविंद भालेराव**
(कार्यक्रमाधिकारी)
**डॉ. ज्ञानेश्वर तडस**
(कार्यक्रमाधिकारी)

**प्रस्तावना:**

श्री गजानन शिक्षण प्रसारक मंडळ, येलदरी कॅम्प द्वारा संचालित (भाषिक अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त)तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सेनगाव जि. हिंगोली येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागा अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेत एकूण१७५ विद्यार्थ्यांचे पथक कार्यरत आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६मध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेहोते. सदरील शैक्षणिक सत्रातील वार्षिक नियमित कार्यक्रम अहवाल खालील प्रमाणे सादर करीत आहोत.

**१.एक पृथ्वी एक आरोग्य संकल्पसह योगदिन उत्साहात साजरा** : दिनांक २१ जून २०२५ (शनिवार) रोजी क्रीडा विभाग व राष्ट्रीय सेवा योजनेच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योगदिन उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्य डॉ. एस. जी. तळणीकर, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. हेमंत शिंदे, योगशिक्षक प्रा. रविशंकर सबनीस, योगशिक्षक डॉ. जी. पी. भालेराव यांच्या हस्ते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. उपरोक्त योग शिक्षकांनी कॉमन योग प्रोटोकॉल नुसार योगाचे प्रात्यक्षिक केले. यावर्षीच्या अकराव्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची संकल्प 'एक पृथ्वी एक आरोग्य "Yoga For One Earth One Health" हा संकल्प पूर्ण करण्यासाठी सिटीलीकरण रक्त संचालन, स्कंधचक्र कटी शक्ती विकासन ताडासन, वृक्षासन, वृक्षासन, पादहस्तासन, अर्धचक्रासन, त्रिकोणासन, भद्रासन, वज्रासन, वक्रासन, उत्तान मंडूकासन, मकरासन, भुजंगासन, सेतुबंध आसन, उत्तानपादासन, हलासन, पवनमुक्त आसन इत्यादी असं करून घेण्यात आले. प्राणायामामध्ये कपालभाती, अनुलोम-विलोम, शीतली प्राणायाम, भ्रमरी प्राणायाम इत्यादी प्राणायामाचे देखील प्रशिक्षण उपस्थित यांना देण्यात आले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**२.लोकराजा छत्रपती शाहू महाराज यांची जयंती उत्साह संपन्न** : दिनांक२६ जून २०२५ रोजी प्रस्तुत महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजनेच्या संयुक्त विद्यमाने लोक राजा छत्रपती शाहू महाराज यांची जयंती उत्साहात संपन्न झाली या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष तळणीकर तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ ए.जी अंभोरे व डॉ. विकास कल्याणकर आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती.

**३.नामदेव भक्तांना रा.से. ओ. तर्फे आरोग्यविषयक प्रबोधन** : दिनांक २० जुलै २०२५ रोजी आषाढी एकादशीच्या पंढरपूर वारीला जे वारकरी विठ्ठलाचे दर्शन घेतात ते भाविक पूर्वापार आवर्जून परंपरेनुसार परतवारी एकादशीला म्हणजेच कामिनी एकादशीला संत नामदेवांचे जन्मस्थळ असलेल्या नरसी नामदेव येथे दर्शन घेऊन वारीची परिक्रमा पूर्णत्वास नेतात. त्याच अनुषंगाने येलदरी, सावंगी, हिवरखेडा खडकी आदी पंचक्रोशीतील शेकडो नामदेव भक्त पायीदिंडीचे आयोजन करतात. उपरोक्त दिंडीचा मुक्काम महाविद्यालयात असतो. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी वारकऱ्यांचे यशोचित स्वागत केले.

रात्रीच्या भोजनाची उत्तम व्यवस्था केली. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी वारकऱ्यांना आरोग्यविषयक बाबी सांगत प्रबोधन केले.

**४.तोष्णीवाल महाविद्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी**

दिनांक ०१ ऑगस्ट २०२५ रोजी महाविद्यालयात शुक्रवारी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने थोर समाजसुधारक, साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व हिंदुस्तानच्या स्वातंत्र्य संग्रामातील एक जहाल व्यक्तिमत्व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीपाद तळणीकर हे होते. डॉ. अशोक अंभोरे, डॉ. पी. एन. तोतला, डॉ. आर. ए. जोशी, प्रा. प्रमोद घन, डॉ. विजय वाघ व डॉ. बजाज यांची प्रमुख उपस्थिती होती. सदर कार्यक्रमात डॉ. विकास कल्याणकर यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जिवन-कार्य व साहित्यावर प्रकाश टाकला तर डॉ. अशोक अंभोरे यांनी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या हिंदुस्तानच्या स्वातंत्र्य संग्रामातील भूमिकेवर आपले मनोगत व्यक्त केले. कार्य कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. गोविंद भालेराव यांनी केले तर आभार डॉ. नवगणकर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यास्वीतेसाठी श्री. प्रकाश कोपनर, श्री. प्रकाश कराळे, श्री. काशीराम वानरे व रा.से.यो. विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संखेने कार्यक्रमाला उपस्थित होते.

**५.पुण्यश्लोक तथा तत्त्वज्ञानी महाराणी अहिल्याबाई होळकर यांचा स्मृतिदिन उत्साहात संपन्न** : दिनांक १३ ऑगस्ट २०२५ रोजी पुण्यश्लोक तत्त्वज्ञानी महाराणी अहिल्याबाई होळकर यांचा स्मृतिदिन राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्यडॉ. एस जी तळणीकर यांनी प्रतिमेचे पूजन केले. अहिल्याबाई होळकर यांच्या कार्यावर प्रकाश टाकण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी डॉ. कल्याणकर पार पाडली . प्रशासकीय व सैन्याच्या कामात त्या विशेष पारंगत होत्या अनेक हिंदू मंदिरांची उभारणी,घाट निर्माण केले. याप्रसंगी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

**६.नगरपंचायत सेनगाव आणि तोष्णीवाल महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'फाळणी भयानकता स्मरण दिवस' साजरा** : दिनांक १४ ऑगस्ट २०२५ रोजी उपरोक्त दिवसाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ एस जी तळणीकर तर प्रमुख पाहुणे म्हणून,डॉ ए.जी अंभोरे. (विभाग प्रमुख), डॉ. जी पी , भालेराव, शिवशंकर बोकारे (लेखापाल नगरपंचायत सेनगाव )जगन्नाथ दिनकर (लिपिक नगरपंचायत सेनगाव आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती. पसायदानाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रारंभी प्रा. कैलास आसेगावकर यांनी दिवस साजरा करण्यामागील भूमिका स्पष्ट केली.एकूणच इतिहासात घडलेल्या घटनांना त्यांनी उजळा दिला. डॉ.ए. जी.अंभोरे , डॉ जी पी भालेराव यांनी प्रासंगिक विचार मांडत हा दिवस साजरा करण्याची गरज का निर्माण झाली याचा सांगोपांग विचार मांडला. .

भारत सरकार निर्मित फाळणी भयानकता स्मरण माहितीपट विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला. डॉ. एस जी तळणीकर यांनी भारतीय स्वातंत्र्यसंग्रा याविषयी विचार मांडत, फाळणीतून निर्माण झालेल्या समस्यांचा आढावा घेतला. माहितीपट महाविद्यालयाच्या सभागृहात दाखविण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. माहितीपटाने तत्कालीन परिस्थितीचे आकलन करणाऱ्या सर्वसामान्य

जनतेला विश्वासात घेतले .विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात होती. कार्यक्रमाचे सुत्र संचलन व आभार प्रदर्शन प्रा. संजय फड यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

**७.तोष्णीवाल महाविद्यालयात एच आय व्ही जनजागृती अभियान** : दिनांक २३ ऑगस्ट २०२५ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आंतरराष्ट्रीय युवा दिन पंधरवडा साजरा करण्यात आला .जगभरातील तरुणांच्या समस्यांकडे सरकार आणि सामान्य जनतेची लक्ष वेधण्यासाठी दिनांक १२ ऑगस्ट हा दिवस जगभरात युवा दिन म्हणून साजरा केला जातो. त्या अनुषंगाने तोष्णीवाल महाविद्यालयात एच. आय. व्ही. एड्स जनजागृती अभियान आयोजित करण्यात आले . कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. जी . तळणीकर तर प्रमुख पाहुण्या श्रीमती अलका रणवीर (संचालिका विहान हिंगोली), किशोर वानखेडे ( समुपदेशक ग्रामीण रुग्णालय सेनगाव) डॉ. राजाभाऊ नवगणकर, डॉ. विकास कल्याणकर, प्रा. ज्ञानेश्वर तडस, प्रा. संजय फड ,डॉ. टापरे मॅडम आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. विकास कल्याणकर यांनी केले श्रीमती अलका रणवीर यांनी एचआयव्ही, गुप्तरोग याविषयी सविस्तर माहिती दिली . उपरोक्त आजार होण्यामागील चार कारणांचा उहापोह केला. विहान संस्थेमार्फत युवकांमध्ये जनजागृती करण्यासाठी अविरतपणे संस्थेचे कार्य चालते जर कोणाला या आजाराविषयी शंका उपस्थित झाली तर विना विलंब त्यांनी सरकारी रुग्णालयाशी संपर्क साधावा त्यातून भविष्यात होणाऱ्या अडचणी नक्कीच कमी होण्यास मदत होते. आज सरकारमार्फत एचआयव्हीग्रस्तांना दरमहा निशुल्क औषध, निशुल्क शस्त्रक्रिया केल्या जातात. या संस्थेत तीन हजार पाचशे पेक्षा अधिक एचआयव्हीग्रस्त सभासदांची नोंद आहे त्या सर्वांना वेळोवेळी समुपदेशन करून सकारात्मक जीवन जगण्यास मदत केली जाते. किशोर वानखेडे यांनी महाराष्ट्र शासन उपरोक्त आजार संपावा यासाठी काय काय करते याची सविस्तर माहिती युवकांना दिली. एकात्मिक सल्ला व तपासणी केंद्र आज उपलब्ध असून गरोदर महिलेसाठी एचआयव्ही तपासण्या किती महत्त्वाच्या आहेत याविषयी माहिती दिली. प्राचार्य डॉ. तळणीकर यांनी अध्यक्षीय समारोप प्रसंगी सांगितले की,युवकांनी स्वतः सजग राहावे व इतरांना सुद्धा सजग होण्यास मदत करावी असे आव्हान केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ जी पी भालेराव यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. राजाभाऊ नवगनकर यांनी केले. कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

**८.तोष्णीवाल महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा** : दिनांक २४ सप्टेंबर २०२५ रोजी राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. एस. जी. तळणीकर, प्रमुख वक्ते डॉ. शिवाजी विठ्ठलराव वायभासे (कै. डॉ. शंकरराव सातव महाविद्यालय कळमनुरी), राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. नवगणकर आर. व्ही., डॉ. भालेराव जी. पी. प्रा. ज्ञानेश्वर तडस, डॉ. अशोक अंभोरे व राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. शिवाजी वायभासे यांनी 'विद्यार्थी जीवनात राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व' या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. आपल्या व्याख्यानात युवकांच्या व्यक्तिमत्व विकासातून समाजसेवा घडली पाहिजे, हाच राष्ट्रीय सेवा योजनेचा उद्देश असल्याचे सांगितले. युवक ही राष्ट्राची साधन संपत्ती असून युवकांच्या विकासावरच राष्ट्राचा विकास अवलंबून

आहे. राष्ट्र सेवेसाठी अष्टोप्रहार तत्पर असणारा युवक राष्ट्रीय सेवा योजनेतून घडतो. राष्ट्रीय सेवा योजनेमुळे युवकांच्या व्यक्तिमत्व विकासात भर पडते, त्यांच्यात सामाजिक जबाबदारीचे भान येते, सेवावृत्ती , व्यक्तिगत व सामाजिक आरोग्य, परिसर स्वच्छता, पर्यावरण संरक्षण जागृती, अंधश्रद्धा निर्मूलन, लिंग समानता, सामाजिक समता, धर्मनिरपेक्षता, राष्ट्रीय एकात्मता इत्यादी अनेक गुणांचा विकास होऊन राष्ट्राच्या प्रगतीला हातभार लागतो. राष्ट्रीय सेवा योजनेत सामील झालेला विद्यार्थी स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करत करत, माझ्यासाठी नव्हे तर मी तुमच्यासाठी आहे (Not Me But You) ही प्रवृत्तीने विकसित करून अहोरात्र समाज सेवेसाठी सजग राहतो. सध्याच्या काळातील दैनंदिन जीवनात निर्माण होणाऱ्या विविध प्रश्न आणि समस्यांचे दाखले देऊन त्यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भालेराव जी.पी. यांनी केले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. नवगणकर आर. व्ही. यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. ज्ञानेश्वर तडस यांनी केले.कार्यक्रमासाठी रा. से. यो. चे स्वयंसेवक विद्यार्थी, प्राध्यापवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

**९.एक दिवस, एक तास, एक साथ अभियान संपन्न** दिनांक २५ सप्टेंबर २०२५ रोज गुरुवार रोजी नगरपंचायत कार्यालय सेनगाव व राष्ट्रीय सेवा योजना तोष्णीवाल महाविद्यालय सेनगाव, यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. २५ सप्टेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय स्वच्छ महाराष्ट्र, अभियान नागरी यांनी निर्देशित केलेल्या आदेश नुसार स्वच्छता ही सेवा योजनेचे अभियान राबविण्यात आले. त्या अनुषंगाने सेनगाव येथील मुख्य रस्त्याची साफसफाई करण्यात आली. समाज स्वच्छते विषयी सजग राहावा यासाठी एक दिवस, एक तास, एक साथ हा नवोदित मूलमंत्र देण्यात आला. उपरोक्त स्वच्छता अभियानात नगरपंचायत सेनगाव चे संपूर्ण कर्मचारी उपस्थित होते, तर रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. राजाभाऊ नवगणकर, डॉ. अशोक अंभोरे, डॉ. जी पी भालेराव व प्रा.ज्ञानेश्वर तडस, प्रा सोनपीर, व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. या स्वच्छता मोहिमेची सांगता तोष्णीवाल महाविद्यालयात सर्व विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ देऊन करण्यात आली.

**१०.तोष्णीवाल महाविद्यालयात म. गांधी आणि लालबहादूर शास्त्री जयंती साजरी** : दिनांक २ ऑक्टोबर २०२५ रोजी महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने महत्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्सहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून मा. प्राचार्य डॉ. एस.जी. तळणीकर, डॉ. अशोक अंभोरे, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. आर.व्ही. नवगणकर, डॉ. गोविंद भालेराव, डॉ. ज्ञानेश्वर तडस, श्री. प्रकाश कऱ्हाळे तसेच महाविद्यालयाचे शिक्षक - शिक्षेकेत्तर कर्मचारी आणि रा.से.यो. विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. आर.व्ही. नवगणकर यांनी म. गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जिवन व व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकला. ते असे म्हणाले की, आजच्या दिवशी भारतात महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री दोन महान व्यक्तींनी जन्म घेतला होता आणि त्यांच्यामुळे भारताची जगात एक वेगळी ओळख निर्माण झाली. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना आदराने आपण सर्वजण बापू असे संबोधतो. गांधीजींचा जन्मदिवस संपूर्ण देशभरात 'गांधी जयंती' म्हणून साजरा केला जातो. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील बापूंची अहिंसक भूमिका एक शक्तिशाली साधन म्हणून आज

जगाने मान्य केले आहे. म्हणूनच गांधींजींचा जन्मदिवस संपूर्ण जगभरात 'आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन' म्हणून साजरा केला जातो. आज गांधी यांची १५६ वी तर शास्त्री यांची १२१ वी जयंती साजरी करत असताना देशवासीयांनी त्यांच्या त्यागाचा आणि बलिदानाचा विसर पडू देऊ नये. सत्य, अहिंसा, अस्पृश्यता याबद्दल समाजजागृती करून खरी मानवता कशी असते याबाबत स्वतःच्याच जीवनाचा आदर्श आपणापुढे ठेवणाऱ्या महात्मा गांधी यांच्या विचारांची प्रासंगिकता आजही टिकून असून त्यांच्या सत्य आणि अहिंसेच्या विचारांनी जगभरातील अनेक नेते भारावून गेले. अनेक जण त्यांनी सांगितलेल्या मार्गाचे अनुकरण करून संघर्षात यशस्वी झाले. गांधीजी नेहमी म्हणत, शरीर आणि मन अस्वच्छ असेल, तर परमेश्वर कधीच प्राप्त होऊ शकणार नाही तथापि, माणसांनी तना-मनाने स्वच्छ राहण्यासाठी त्यांची गावे, शहरे आणि परिसरही स्वच्छ ठेवावयास हवा. पृथ्वी, हवा, भूमी आणि पाणी हे सर्व आपण पुढील पिढ्यांसाठीची जोखीम असून ती किमान जशीच्या तशी त्यांच्या हाती सोपवणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

जय जवान, जय किसान अशी घोषणा देणारे देशाचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची ही जयंती देशात उत्सहात साजरी केली जाते. 'साधी राहणी आणि उच्च विचारसरणी' असणाऱ्या शास्त्रींनी संपूर्ण जगाला दाखवून दिले की, एखाद्याकडे आत्मविश्वास असेल तर कोणतेही ध्येय गाठणे कठीण नसते. गांधींच्या विचाराने आणि जीवनशैलीने प्रभावित झालेल्या शास्त्रींनी गांधींच्या असहकार चळवळी दरम्यान देशसेवेचे व्रत स्वीकारले. ९ जून १९६४ ते ११ जानेवारी १९६६ अशा दोन वर्षापेक्षा कमी कालावधीसाठी पंतप्रधानपदी राहिलेल्या शास्त्रींनी त्यावेळच्या भीषण मंदी आणि दुष्काळाच्या स्थितीमध्ये देशवासीयांना आठवड्यातून एकवेळ उपाशी राहण्याचे आवाहन केले होते. पुढे त्यांच्या नेतृत्वाखाली देशात हरित क्रांतीस सुरुवात झाली आणि देश अन्नधान्याच्या बाबतीत हळूहळू स्वयंपूर्ण बनला.

गांधी-शास्त्री जयंतीच्या निमित्ताने सत्य, अहिंसा, साधी राहणी, उच्च विचारसरणी आणि निरोगी आरोग्यमान या पंचसूत्रीचा अवलंब प्रत्येकाने विशेषतः युवा पिढीने करावा. आपण समाजसुधारणे बरोबरच व्यसनाधीनता नाहीशी करून 'विज्ञाननिष्ठ' भारत घडविला तर हीच खरी गांधी आणि शास्त्री यांना आदरांजली ठरेल.

**११.थोर सेनानी, गांधीवादी नेते कै.गंगाप्रसाद अग्रवाल यांना विनम्र अभिवादन :** दिनांक ११ऑक्टोबर २०२५ रोजी महाविद्यालयात कै. गंगाप्रसादजी अग्रवाल यांच्या पुण्यस्मरण निमित्त विनम्र आदरांजली वाहण्यात आली.या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.एस.जी.तळणीकर तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. प्रमोद घन, डॉ. एस.आर.पजई, डॉ.अंभोरे ए.जी., डॉ. निखिलेश बजाज आदी मान्यवर मंडळी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी कै. गंगाप्रसादजी अग्रवाल यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले, त्यानंतर डॉ ए.जी.अंभोरे यांनी आपले प्रास्ताविकपर विचार मांडताना कै अग्रवाल विषयी सर्वस्पर्शी माहिती सांगून असा नेता होणे नाही असे विचार मांडले. एकूणच त्यांचे व्यक्तिमत्व हे बहुरंगी होते. वेळोवेळी आपल्या भूमिका सुद्धा त्यांनी बदलल्या, ब्रिटिशांशी संघर्ष करत करत नंतरच्या काळात भारतीय स्त्रियांवर जे काही अत्याचार होतात त्याचाही मागोवा त्यांनी घेतला.

प्राचार्य डॉ.एस.जी.तळणीकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये संपूर्ण आयुष्यभर कै. अग्रवाल यांनी आपल्या विचारांशी, जनकल्याणासाठी तडजोड केली नाही असे बहुआयामी व्यक्तिमत्व होणे नाही.

अशी भावना व्यक्त केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

**१२.तोष्णीवाल महाविद्यालयात नशा मुक्त भारत अभियान संपन्न** : महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक १९ नोव्हेंबर २०२५ बुधवार, रोजी 'नशा मुक्त भारत' या अभियाना अंतर्गत शपथ घेण्यात आली. निरोगी समाज ही देशाची महत्तम गरज असून देश उभारणीस त्यांची भूमिका निर्णायक आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी व्यसनापासून स्वतःला अलिप्त ठेवावे व दुसऱ्यालाही व्यसनापासून सावध करावे. सर्वांची ही प्रमुख जबाबदारी आहे याप्रसंगी महाविद्यालयीन विद्यार्थी, विद्यार्थिनी सह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**१३.भारतीय संविधानावर व्याख्यान संपन्न** : दिनांक २७ नोव्हेंबर २०२५ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने भारतीय संविधान स्वीकारल्याच्या स्मरणार्थ तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली संविधान सभेच्या मसुदा समितीच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एस.जी. तळणीकर, प्रमुख वक्ते डॉ. ए जी अंभोरे तर प्रमुख उपस्थिती डॉ पी बी पाटील, प्रा. कैलास आसेगावकर, डॉ. गोविंद भालेराव आदी मान्यवर मंडळी उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रास्ताविक करताना डॉ. भालेराव यांनी उपरोक्त दिवसाचे औचित्य सांगितले. मुख्य वक्ते डॉ. ए जी अंभोरे यांनी समग्र भारतीय राज्यघटनेचा आढावा घेतला. त्यानुसार भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीचा घटनाक्रम म वर्ष-१८८९ असून त्या अनुषंगाने होमरूल योजना आणण्यात आली. तेव्हापासून घटनेच्या प्रवासाला सुरुवात झाली. विधेयक तयार करून त्यास होमरूल विधेयक असे संबोधले जाऊ लागले. होमरूल हा शब्द ॲनी बेझंट यांनी प्रचलित केला. 'भारतीय राज्यघटना विधेयक १८९५' नावाने सादर केले. न्यायमूर्ती गोखले यांनी राजकीय सनद तयार केली. काँग्रेस व लीगने 'लीग योजना' मसुदा तयार केला. १९१८ मध्ये स्वराज्य देशाची मागणी हा लेख महात्मा गांधींनी लिहिला. मोतीलाल नेहरूंनी १९२४ मध्ये नेहरू अहवाल सादर केला त्यात ८७ कलम होती. भारतीय घटना तयार करण्यास आपण सक्षम आहोत त्यासाठी कोणत्याही परकीय शक्तीची मदत नको असे यातून सिद्ध केले. घटना सभेच्या निवडणुका घेण्यासंबंधी फैजपूर काँग्रेस अधिवेशनात ठराव पास केला. १९३ जागांसाठी निवडणुका घेण्यात आल्या. मूलभूत हक्क अल्पसंख्यांक इत्यादी विषयावर घटना समितीच्या उप समित्या नेमल्या. २९ ऑगस्ट १९४८ ला मसुदा समिती स्थापन करून डॉ. आंबेडकर यांची निवड अध्यक्ष म्हणून करण्यात आली. २१ फेब्रुवारी १९४८ ला मसुदा सादर करून तीनदा वाचन केले. त्यात ७,६३५ दुरुस्त्या मांडल्या. प्रत्यक्षात २४७३ दुरुस्त करण्यात आल्या. सर एन राव या संधी या सनदी अधिकाऱ्याने कायदा १९३५ चा तयार केला. अशा असंख्य लोकांच्या योगदानातून भारतीय राज्यघटना प्रत्यक्षात तयार झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. तळणीकर यांनी अध्यक्षीय समारोप करत भारतीय राजकीय घटनेचा आदर बाळगणे ही समस्त भारतीयांचे कर्तव्य आहे, त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी सुद्धा याबाबत सजग राहावे असा मोलाचा सल्ला दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संजय फड यांनी केले तर डॉ. नवगणकर यांनी सर्वांच्या आभार मानले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. ज्ञानेश्वर तडस उपस्थित होते. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या परिश्रमाने कार्यक्रम यशस्वी झाला. या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक मोठ्या प्रमाणात उपस्थित

होते.

**१४.लोक महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या विचारांचा जागर** : दिनांक २३ डिसेंबर २०२५ मंगळवार रोजी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग, रा. से. यो. विभाग व श्री शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. पंजाबराव भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त ,लोक महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जीवन व कार्य या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रोफेसर पी बी पाटील तर प्रमुख उपस्थितीत प्राचार्य डॉक्टर रामेश्वर भिसे (आयोजक), मुख्य वक्ते प्रा. विशाल नंदा गवळी, प्रा. संतोष बदने (समन्वयक) प्रा. अभय राऊत आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती. विशेष व्याख्यानाचे प्रास्ताविक करताना प्रा.अक्षय राऊत यांनी कार्यक्रमा मागील भूमिका मांडून वैचारिक मजबुतीकरण ही काळाची गरज आहे असे सांगितले. मुख्य वक्ते प्रा. विशाल नंदा गवळी यांनी आपल्या दमदार शैलीतून भाऊ साहेबांच्या विचारांचा जागर करणे हा व्याख्यानाचा मुख्य हेतू असून विचारांची प्रासंगिकता उदाहरणासह स्पष्ट करून सांगितली. संपूर्ण आयुष्यात वेगवेगळ्या जबाबदाऱ्या अत्यंत नेटाने पार पाडल्या त्यात कृषी क्षेत्र, भारतीय राज्यघटना निर्मिती, समाज सुधारणा अशा अनेक बाबींचा समावेश होतो. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. विजय वाघ यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा .संजय फड यांनी केले. महाविद्यालयातील विद्यार्थी,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

**१५.तोष्णीवाल महाविद्यालयात एच आय व्ही एड्स जनजागृती अभियान व चाचणी शिबिर** : महाविद्यालयात दिनांक ३० डिसेंबर २०२५ रोज मंगळवार रोजी जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा कार्यक्रम अधिकारी सामान्य रुग्णालय हिंगोली व वैद्यकीय अधीक्षक ग्रामीण रुग्णालय सेनगाव तथा राष्ट्रीय सेवा योजना तोष्णीवाल महाविद्यालय सेनगाव यांच्या संयुक्त विद्यमाने एच.आय.व्ही. एड्स जनजागृतीकार्यक्रमाचे आयोजन किशोर वानखेडे (समन्वयक) यांचे एच.आय.व्ही. एड्स जनजागृतीपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. एस. जी. तळणीकर, प्रमुख मार्गदर्शक किशोर वानखेडे (समुपदेशक ग्रामीण रुग्णालय सेनगाव ) स्वाती पारसकर – लॅब टेक्निशियन, आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. ज्ञानेश्वर तडस यांनी करून कार्यक्रमाच्या आयोजना मागील भूमिका मांडली. मुख्य मार्गदर्शक मानखडे यांनी एड्स आणि एच. आय. व्ही. यातील फरक सांगत या रोगाची लागण कशी होते ते सांगितले. असुरक्षित लैंगिक संबंध, एच.आय.व्ही. बाधित व्यक्तींचे रक्त तसेच गरोदर माते पासून तिच्या बाळाला कखत होऊ शकतो. नवजात बाळाला कखत पासून वाचविण्यात संशोधनाने यश प्राप्त केले आहे. त्या दृष्टीने मातेला व बाळाला उपचार देऊन अर्भकाला संसर्ग होण्यापासून रोखता येते. रोगप्रतिकार क्षमता वाढवत भविष्यात या आजाराच्या अनुषंगाने काही समस्या उद्भवल्या तर टोल फ्री १०९७ वर संपर्क साधावा योग्य ते मार्गदर्शन देखील केले जाते. स्वाती पारसकर प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना तरुणांनी एच.आय.व्ही. बाबतीत सावधगिरी बाळगावी. असे सांगत युवकांनी जंक फूड पासून दूर राहावे कारण त्यात मोठ्या प्रमाणामध्ये प्रिझर्वेटिव्ह वापरले जातात की ज्याचा भविष्यात होणाऱ्या संततीवर सुद्धा वाईट परिणाम घडतो. विवाह ठरविताना एचआयव्ही टेस्ट करावी. मोबाईल हे दुधारी शस्त्र आहे त्याचा योग्य

तोच वापर करा. आपल्या आई वडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी सर्व तरुण-तरुणींनी आपल्या भावी जीवन व भावी करिअर व्यवसाय संबंधी जागृत राहणे गरजेचे आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ राजाभाऊ नवगणकर यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. गोविंद भालेराव यांनी केले. प्रा. चाटसे,प्रा. सोनपीर, प्रा. भुक्तर, प्रा. सावळे,प्रा काळबांडे, प्रा.घुले, प्रा. आसेगावकर , प्रा. फड, प्रा. इंगोलेव राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

**१६.डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन:** दिनांक ०६ डिसेंबर २०२५ रोजी महाविद्यालयात रा. से. यो. विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाणा दिन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाच्याा अध्यक्षस्थानी प्राचार्य प्राचार्य डॉ. एस. जी. तळणीकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून इतिहास विभाग प्रमुख डॉक्टर ए जी अंभोरे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जी पी. भालेराव यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. नवगणकर यांनी केले. कार्यक्रमासाठी रा. से. यो. चे स्वयंसेवक विद्यार्थी, प्राध्यापवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

**१७.सावित्रीबाई फुले जयंती साजरी:** दिनांक ०३ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयात रा. से. यो. विभागाच्या वतीने क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.जी. तळणीकर होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा. से. यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. जी पी. भालेराव यांनी केले. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन प्रतिमेचे पूजन करण्यात आले. अध्यक्ष व प्रमुख पाहूणे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. ज्ञानेश्वर तडस यांनी केले. तर आभार प्रदर्शन डॉ. आर. व्ही.नवगणकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रा. से. यो. स्वयंसेवक विद्यार्थी व प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

**१८.तोष्णीवाल महाविद्यालयात राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांना विनम्र अभिवादन :** दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनाविभागाच्या वतीने राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात प्राचार्य डॉ.एस.जी. तळणीकर यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी डॉ. पी. बी. पाटील, डॉ. आर. व्ही.नवगणकर, डॉ. जी पी. भालेराव, डॉ. ज्ञानेश्वर तडस, डॉ. हेमंत शिंदे, डॉ. निखिलेश बजाज यांची प्रमुख उपस्थिती होती. या सर्व उपस्थितांनी प्रतीमेस पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली.

**१९.छत्रपती शिवराय यांची जयंती उत्साहात संपन्न**

दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ गुरुवार महाविद्यालयात रा. से. यो. विभागाच्या वतीने रोजी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवरायांची जयंती उत्साहाने संपन्न झाली याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.एस.जी. तळणीकर तर प्रमुख पाहुणे म्हणून इतिहास विभाग प्रमुख डॉ. ए. जी. अंभोरे, डॉ. एस. आर. पजई, डॉ. आर. व्ही नववणकर, प्रकाशराव देशमुख, प्रा. चव्हाण आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा कार्यक्रम अधिकारी डॉ. आर. व्ही.नवगणकर यांनी छत्रपती शिवरायांच्या कार्याचा मागोवा घेत रयतेसाठी अष्टो प्रहर लढणारा एकमेव राजा म्हणून त्यांना गौरवण्यात आले.अष्टप्रधान मंडळाच्या कार्यातून सर्व समावेशक उन्नती काय असते

हे दाखवून दिले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. जी.तळणीकर यांनी छत्रपती शिवरायांच्या आरमाराविषयी माहिती सांगत शत्रूंना नेस्तनाबूत करण्यासाठी उचललेल्या पावलांचा आढावा घेतला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

**२०.संत गाडगेबाबा यांची जयंती:** दिनांक २३ फेब्रुवारी २०१८ रोजी संत गाडगेबाबा यांची जयंती राष्ट्रीय सेवा योजनाविभागाच्या साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्राचार्य डॉ. एस. जी.तळणीकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. ए. जी. अंभोरे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. आर. व्ही नववणकर यांनी केले. संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पुजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी गाडगेबाबा यांच्या स्वच्छतेचा संदेश या विषयीचा आढावा प्रमुख पाहुण्यांनी व अध्यक्षांनी घेतला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. जी. पी. भालेरावयांनी केले. तर आभार डॉ. ज्ञानेश्वर तडस यांनी मानले.

**२१.शीश कटा पर झुका नही, गुरु तेगबहादूर समागम वर्ष या कार्यक्रमाचे आयोजन** : तोष्णीवाल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य, तख्त हजूर साहेब, गुरुनानक नाम लेवा संगत, अखिल भारतीय धर्म जागरण समन्वय व राष्ट्रीय सेवा योजनाविभाग सेनगाव यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २३.१.२०२६ रोजी सिर दिया पर सरर न दिया या तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदि शताब्दी वर्षानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. जी.तळणीकर मुख्य वक्ते शीख धर्माचे जाणकार डॉ. गोविंद भालेराव तर प्रमुख पाहुणे प्रा. संजय फड, प्रा. राजेश तोष्णीवाल, प्रा. चाटसे, डॉ. आर. व्ही नववणकर,डॉ. ज्ञानेश्वर तडस आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती.

उपरोक्त कार्यक्रमाच्या अनुषंगाने सिस दिया पर सिरर न दिया या ओवी चा मतितार्थ गुरु तेगबहादूर बहादुर साहेब यांच्या त्यागमय जीवनावर आधारित असून त्यांचे संपूर्ण जीवन धार्मिक स्वातंत्र्य मानवता सहिष्णता व अन्याय विरुद्ध संघर्ष यासाठी खर्च केले. हिंद दी चादर म्हणजे धर्म स्वातंत्र्य मानवतेची कवच म्हणजेच गुरु तेगबहादुर ही म्हण पंजाब मध्ये प्रचलित झाली समाजातील सर्व घटकांच्या हक्कासाठी दिलेल्या बलिदानची संपूर्ण सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना सांगण्यात आली. प्रत्येक व्यक्ती आपल्या संरक्षणासाठी गुरूकडे शरण येत असे अशा प्रसंगी मुलांनी म्हणजे श्री गुरुगोविंद सिंग यांनी केलेल्या ज्याजवल्य वाणी विचाराने गुरुतेग बहादूर यांना वेगळे बळ प्राप्त झाले आपला उत्तराधिकारी गुरु पदास पात्र आहे याची जाणीव झाल्यानेच मोगल सत्तेशी कडवी झुंज देत मातृभूमीसाठी प्राणाचे बलिदान देण्याचा दृढनिश्चय केला. महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थिनी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.संजय फड यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. आर. व्ही नववणकर यांनी केले.



गोंडाळा येथे रासेयो विशेष युवक शिबिरात नेत्र तपासणी शिबिर संपन्न

देशोन्नती वृत्तसंकलन...

सेनगाव : ५ फेब्रुवारी रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड, राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,सेनगाव येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित, शाश्वत विकासासाठी युवक जलसंधारण व्यवस्थापन आणि औसाड भूमी विकासावर विशेष भर विशेष युवक शिबिरामध्ये नेत्र तपासणी शिबिर संपन्न झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. एस एस अग्रवाल तर प्रमुख पाहुणे देशमुख मुख्याध्यापक, डॉ विजया अग्रवाल,एमबीबीएस एम एस नेत्ररोगतज्ञ, लक्ष्मी लाइफ केअर हॉस्पिटल हिंगोली , डॉ. स्वाती जोजार, अंगणवाडी आशा वर्कर, ललिता कोंढारे इंदुबाई उबाळे , डॉ. प्रवीण तोतला डॉ. राजेश जोशी, डॉ. बजाज कार्यक्रमाधिकारी डॉ. नवगनकर , डॉ.जी पी भालेराव डॉ. ज्ञानेश्वर तडस आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती यावेळी ( डॉ. विजया अग्रवाल. MBBS M.S. Opth लक्ष्मी लाईफ केअर हॉस्पिटल हिंगोली) यांनी ७० रुग्णांची नेत्र तपासणी केली त्यापैकी ३५ रुग्ण हे मोतीबिंदू बाधित असून त्यांच्या शस्त्रक्रियेची गरज आहे. ग्रामस्थांना डोळ्याविषयी सजग राहण्यासाठी काही महत्त्वपूर्ण बाबी सांगण्यात आल्या की ज्या ग्रामस्थांनी पूर्ण स्वीकारण्याचा संकल्प केला . ग्रामपंचायत सदस्य, गावातील प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होती नेत्र तपासणी शिबिर यशस्वी करण्यासाठी रासेयो स्वयंसेवक व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले . (तालुका प्रतिनिधी)



देशोन्नती

www.deshonnati.com

रासेयो युवक शिबिरात करिअर व सायबर साक्षरतेचे धडे

देशोन्नती वृत्तसंकलन..

गोंडाळा येथे तोष्णीवाल महाविद्यालयाचे शिबीर

## रासेयो शिबिर




सेनगाव येथील तोष्णीवाल महाविद्यालयाचे रासेयो शिबिर गोंडाळा येथे सुरु आहे. शिबिराच्या उदघाटनप्रसंगी विद्यार्थी, ग्रामस्थ.

# गोंडाळा येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष युवक शिबिराचे उदघाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

सेनगाव : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सेनगाव येथील तोष्णीवाल महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने गोंडाळा येथे २ ते ८ फेब्रुवारीदरम्यान शाश्वत विकासासाठी युवक, या संकल्पनेवर आधारित विशेष युवक शिबिर सुरु आहे.

घनश्याम बहिरवाल यांच्या हस्ते शिबिराचे उदघाटन झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. जी. तळणीकर, तर प्रमुख पाहुणे म्हणून सुभाष उबाळे, व्ही. डी. देशमुख, शंकर कीर्तनकार, ग्रामसेवक अक्षय पवार, भीमराव कोळेकर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाधिकारी प्रा. ज्ञानेश्वर तडस यांनी शिबिरात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती प्रास्ताविकात दिली.

प्राचार्य डॉ. तळणीकर यांनी महात्मा गांधींच्या विचारांचा आदर्श ठेवून युवकांनी सामाजिक जबाबदारीने काम करावे, ग्रामीण भागातील उणिवा दूर करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन केले. प्रा. टी. यू. केंद्रे यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. आर. व्ही. नवगणकर यांनी आभार मानले. यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# देशोन्नती

## गोंडाळा येथे रासेयो विशेष युवक शिबिरात नेत्र तपासणी शिबिर संपन्न

देशोन्नती वृत्तसंकलन...



**सेनगाव** : ५ फेब्रुवारी रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सेनगाव येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित, शाश्वत विकासा साठी युवक जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसाड भूमी विकासावर विशेष भर विशेष युवक शिबिरामध्ये' नेत्र तपासणी शिबिर संपन्न झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. एस एस अग्रवाल तर प्रमुख पाहुणे देशमुख मुख्याध्यापक, डॉ विजया अग्रवाल, एमबीबीएस एम एस नेत्ररोगतज्ञ, लक्ष्मी लाइफ केअर हॉस्पिटल हिंगोली, डॉ. स्वाती जोजार, अंगणवाडी आशा वर्कर, ललिता कोंढारे इंदुबाई उबाळे, डॉ. प्रवीण तोतला डॉ. राजेश जोशी, डॉ. बजाज कार्यक्रमाधिकारी डॉ. नवगनकर , डॉ.जी पी भालेराव डॉ. ज्ञानेश्वर तडस आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती यावसंगी ( डॉ. विजया अग्रवाल. MBBS M.S. Opth लक्ष्मी लाईफ केअर हॉस्पिटल हिंगोली) यांनी ७० रुग्णांची नेत्र तपासणी केली त्यापैकी ३५ रुग्ण हे मोतीबिंदू बाधित असून त्यांच्या शस्त्रक्रियेची गरज आहे. ग्रामस्थांना डोळ्याविषयी सजग राहण्यासाठी काही महत्त्वपूर्ण बाबी सांगण्यात आल्या की ज्या ग्रामस्थांनी पूर्ण स्वीकारण्याचा संकल्प केला . ग्रामपंचायत सदस्य, गावातील प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होती नेत्र तपासणी शिबिर यशस्वी करण्यासाठी रासेयो स्वयंसेवक व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले . (तालुका प्रतिनिधी)

Hingoli Edition
Feb 06, 2026 Page No. 7
Powered by: erelego.com

# थोर सेनानी गांधीवादी नेते कै. गंगाप्रसाद अग्रवाल यांना अभिवादन

देशोन्नती वृत्तसंकलन...



सेनगाव :येथील तोष्णीवाल कला.वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात स्वातंत्र्य सेनानी, गांधीवादी नेते कै. गंगाप्रसाद अग्रवाल यांच्या पुण्यस्मरणानिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी कै. गंगाप्रसाद अग्रवाल यांच्या प्रथमेश पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.एस.जी.तळणीकर तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. प्रमोद घन, डॉ. एस.आर.पजई, डॉ.अंभोरे ए.जी., डॉ. निखिलेश बजाज आदी मान्यवर मंडळी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी कै. गंगाप्रसाद अग्रवाल यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले, त्यानंतर डॉ ए.जी.अंभोरे यांनी आपले प्रास्ताविकपर विचार मांडताना कै. अग्रवाल विषयी सर्वस्पर्शी माहिती सांगून असा नेता होणे नाही, असे विचार मांडले. एकूणच त्यांचे व्यक्तिमत्व हे बहुरंगी होते. वेळोवेळी आपल्या भूमिका सुद्धा त्यांनी बदलल्या, ब्रिटिशांशी संघर्ष करत करत नंतरच्या काळात भारतीय स्त्रियांवर जे काही अत्याचार होतात त्याचाही मागोवा त्यांनी घेतला. यावेळी प्राचार्य डॉ.एस.जी. तळणीकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये संपूर्ण आयुष्यभर कै. अग्रवाल यांनी आपल्या विचारांशी, जन कल्याणासाठी तडजोड केली नाही असे बहुआयामी व्यक्तिनत्व होणे नाही. अशी भावना व्यक्त केली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# 'तोष्णीवाल'मध्ये राष्ट्रीय सेवा योजना दिन

**हिंगोली :** सेनगाव येथील तोष्णीवाल महाविद्यालयात गुरूवारी (ता. २५) राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.एस.जी. तळणीकर होते. प्रमुख वक्ते म्हणून कै. डॉ. शंकरराव सातव महाविद्यालय, कळमनुरी येथील डॉ. शिवाजी विठ्ठल वायभासे उपस्थित होते.डॉ. शिवाजी वायभासे यांनी विद्यार्थी जीवनातील राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गोविंद भालेराव यांनी केले. प्रास्ताविक डॉ. नवगणकर यांनी, तर आभार प्रा. ज्ञानेश्वर तडस यांनी केले.

# शाश्वत विकासासाठी युवक: जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसाड भूमी विकासावर विशेष भर

तोष्णीवाल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सेनगाव येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सात दिवसीय विशेष युवक शिबिर शाश्वत विकासासाठी युवक: जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसाड भूमी विकासावर विशेष भर मौजे गोंडाळा ता. सेनगाव जि. हिंगोली येथे दिनांक ०२ फेब्रुवारी २०२६ ते ०८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आले होते. सदरील सात दिवसीय विशेष युवक शिबिरामध्ये विविध सामाजिक, बौद्धिक, प्रबोधनात्मकतसेच सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेहोते. सदरशैक्षणिक सत्रातील वार्षिक विशेष युवक शिबीर कार्यक्रम अहवाल खालील प्रमाणे सादर करीत आहोत.

दिनांक ०२ फेब्रुवारी २०२६ रोजी मौजे गोंडाळा ता. सेनगावजि. हिंगोली येथे शिबिरस्थळी शिबिरार्थींचे आगमन झाले. त्यानंतर शिबिरार्थींची निवास व्यवस्था, रासेयोस्वयंसेवक व स्वयंसेविकागट तयार करणे व परिसर स्वच्छता आदींचे व्यवस्थापन करण्यात आले. सायंकाळच्या सत्रात रासेयो स्वयं सेवक तसेच कार्यक्रमाधिकारी यांनी वंशेश्वर महादेव देवस्थान परिसर स्वच्छताकरण्यात आली.

सदरविशेष युवक शिबिराचे उद्घाटन दिनांक ०३ फेब्रुवारी २०२६ मंगळवार रोजी मा. श्री घनश्याम सखाराम बहिरवाल ज्येष्ठ नागरिक यांच्या शुभ हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.जी. तळणीकर तर प्रमुख पाहुणे म्हणून गोंडाळा गावचे प्रथम नागरिक सौ. श्रीमती सुभाष उबाळे, श्रीव्ही. डी. देशमुख, (मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गोंडाळा), शंकर आप्पा कीर्तनकार (मुख्य पुजारी, वंशेश्वर महादेव संस्थान गोंडाळा), ग्रामसेवक श्रीअक्षय पवार, भीमराव कोळेकर( वंशेश्वर गोशाळा ) आदि मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात कार्यक्रमाधिकारी डॉ. ज्ञानेश्वर तडस यांनी सदर शिबिरात राबविल्या जाणाऱ्या सायबर साक्षरता व सुरक्षा, नशामुक्ति, बालविवाह प्रतिबंध, मतदारजागृती, समृद्धलोकशाही, दंत तपासणी शिबिर, ग्राम स्वच्छता, सर्व रोगनिदान शिबीर, पशुधन चिकित्सा, लसीकरण व संवर्धन, नेत्र तपासणी शिबीर, दंत रोग निदान शिबीर, जलसाठा व संवर्धन, वृक्षारोपण, अझोला प्रकल्प व गांडूळ खत, शेतकरी मेळावा व मार्गदर्शन, महिला मेळावा, एड्स जनजागृती, सांस्कृतिक व बौद्धिक इत्यादी कार्यक्रमा विषयी माहिती दिली. प्राचार्य डॉ एस जी तळणीकर यांनी महात्मा गांधींचा आदर्श समक्ष ठेवून तत्परतेने काम करावे. ग्रामीण परिसरातील उणीवा दूर करण्याचा प्रयत्न व्हावा, बालविवाह रोखण्यासाठी शिबिरार्थ्यांनी सेतू बनावे व कुप्रथा संपुष्टात आणावी. आपल्या रोजच्या जीवनात शिस्तीला प्राधान्य देत,निरोगी आयुष्य जगण्यासाठी व्यसनापासून दूर राहावे असा सल्ला देखील दिला. मुख्याध्यापक श्री व्ही. डी. देशमुख यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून गाव परिसरात असलेल्या कुप्रथा संपुष्टात आणण्यासाठी सामाजिक प्रबोधन करावे असे आव्हान युवकांना केले. प्रासंगिक उदाहरण देत शिबिरात चैतन्य निर्माण केले.

राष्ट्रीय मतदार दिवसाच्या अनुषंगाने मतदानासाठी नेहमीच सजग राहून मतदान करेल अशी शपथ विद्यार्थ्यांकडून घेण्यात आली. कार्यक्रमाचे

सूत्रसंचालन प्रा. टी यु केंद्रे. यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. आर. व्ही. नवगणकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रासेयोस्वयंसेवक व स्वयंसेविका कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

दिनांक ०४ फेब्रुवारी २०२६ बुधवार रोजी दंत तपासणी शिबिर आयोजीत करण्यात आले होते. प्रस्तुत महाविद्यालय रासेयो विभाग व डॉ. हेडगेवार डेंटल कॉलेज अँड हॉस्पिटल हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने दंत तपासणी शिबिर प्रचंड प्रतिसादा सह संपन्न झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच सौ. श्रीमतीताई उबाळे, मुख्याध्यापक श्री व्ही.डी.देशमुख, रामेश्वर चोपडे शिक्षक, परमेश्वर टोम्पे आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. ज्ञानेश्वर तडस यांनी केले. दंत महाविद्यालयाच्या टीम मध्ये डॉ. अमिषा लाटे, डॉ. प्रीती लहाने, डॉ.स्वाती बोधीकर, डॉ.स्नेहा दळवी, डॉ. शितल बोडके, डॉ. अश्विनी मगर, डॉ. तेजस्वी नागणे,डॉ.पूजा मुढे यांच्या संपूर्ण टीमने शिबिरामध्ये १३० दंतरोग बाधित रुग्णांची तपासणी केली तसेच पुढील उपचारासाठी डॉ हेडगेवार दंत महाविद्यालय आणि रुग्णालय हिंगोली येथे पाठविण्यात येणार आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रावजी कोळेकर,भिमराव कोळेकर, अमोल अंभोरे, ग्रामपंचायत कर्मचारी, प्रशाळेतील शिक्षकेतर कर्मचारी तसेच रासेयोस्वयंसेवक व स्वयंसेविका परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ज्ञानेश्वर तडस यांनी केले तर डॉ. आर व्ही नवगणकर यांनी मानले.

दुपारच्या सत्रात जिल्हा परिषद शाळा गोंडाळा या ठिकाणी विशेष मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रसंगी मुख्याध्यापकश्री व्ही. डी. देशमुख, चोपडे सर आणि महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.जी पी भालेराव, डॉ. आर. व्ही. नवगणकर व डॉ. डी. पी. तडस, साधन व्यक्ती म्हणून डॉ. आर. एस. गोरे, डॉ. डी.जी. सावंत, डॉ. विजय वाघ, डॉ. एच. टी.शिंदे, प्रा. बी. जे.गायकवाड व श्री प्रकाश देशमुख मंचावर उपस्थित होते.

डॉ. दत्ता सावंत यांनी विद्यार्थ्यांना ‟दहावीनंतर वेगवेगळ्या करिअर संधी” या विषयावर सविस्तर असे मार्गदर्शन केले. पुढे बोलताना त्यांनी दहावीनंतर वेगवेगळ्या करिअर संधीचे विस्तृत असे विवेचन करून दहावीनंतर कला विज्ञान व वाणिज्य शाखेतून वेगवेगळ्या संधीची माहिती दिली. पुढे बोलताना कला शाखा ही सर्व शाखांची जननी आहे असे त्यांनी प्रतिपादन केले. त्यानंतर त्यांनी आपल्या मार्गदर्शनात तोष्णीवाल महाविद्यालयात असलेल्या विविध कोर्सेसची,घेतल्या जाणाऱ्या कार्यक्रमांची व पायाभूत सुविधांची माहिती दिली.

दुसरे साधन व्यक्ती म्हणून डॉ. राजेश गोरे यांनी ‟सायबर साक्षरता व सुरक्षितता:काळाची गरज” या विषयावर विद्यार्थ्यांना विस्तृत असे मार्गदर्शन केले. पुढे बोलताना ते असे म्हणाले की,आजची युग हे डिजिटल क्रांतीची युग असून या युगामध्ये आपल्याला डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक असून त्याबाबत आपण साक्षर व सुरक्षित होणे गरजेचे आहे. तंत्रज्ञानाच्या युगात वावरत असताना आपण या तंत्रज्ञानाचे फायदे व तोटे देखील दुर्लक्षित करून चालणार नाही असे त्यांनी विषेद केले. सायबर साक्षरता व सुरक्षा याच्या अनुषंगाने डिजिटल जीवनातील वेगवेगळे पैलू लक्षात घेणे महत्त्वाचे आहे असे त्यांनी सांगितले. सायबर गुन्हेगारी ही अदृश्य स्वरूपाची गुन्हेगारी असून त्यापासून आपण सर्वांनी सावध असले पाहिजे असे त्यांनी प्रतिपादित केले. पुढे बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान आपला मित्र आहे, पण जागृती नसल्यास ते शत्रू ठरू शकतात असे प्रतिपादन

केले.

यानंतर डॉ. व्ही. जी. वाघ यांनी विद्यार्थ्यांना दहावीच्या परीक्षेबद्दल सविस्तर असे मार्गदर्शन केले. दहावीच्या परीक्षेला सामोरे जाताना नकारात्मक विचारापासून दूर राहावे असे सांगितले. मार्गदर्शनासाठी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक श्री व्हि. डी. देशमुख यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. जी. पी. भालेराव यांनी केले.

दिनांक ०५/०२/२०२६गुरुवार रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष युवक शिबिरात नेत्र तपासणी शिबिर आयोजीत करन्यात आले होते.सदर नेत्र तपासणी शिबिर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. एस. एस. अग्रवाल तर प्रमुख पाहुणे श्री व्ही. डी. देशमुख मुख्याध्यापक, डॉ विजया अग्रवाल नेत्ररोगतज्ञ (एमबीबीएस एम एस), लक्ष्मी लाइफ केअर हॉस्पिटल हिंगोली, डॉ. स्वाती जोजार, अंगणवाडी आशा वर्कर ललिता कोंढारे, इंदुबाई उबाळे, डॉ. प्रवीण तोतला, डॉ. राजेश जोशी, डॉ. निखिलेश बजाज कार्यक्रमाधिकारी डॉ. नवगनकर, डॉ.जी पी भालेराव डॉ. ज्ञानेश्वर तडस आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती.

याप्रसंगी डॉ. विजया अग्रवाल (MBBS M.S.Oth) लक्ष्मी लाईफ केअर हॉस्पिटल हिंगोली यांनी ७०रुग्णांची नेत्र तपासणी केली त्यापैकी ३५ रुग्ण हे मोतीबिंदू बाधित असून त्यांच्या ऑपरेशनची गरज आहे असे ग्रामस्थांच्या निर्दर्शनास आनुन दिले. ग्रामस्थांना डोळ्याविषयी सजग राहण्यासाठी काही महत्त्वपूर्ण बाबी सांगण्यात आल्या की ज्या ग्रामस्थांनी पूर्ण स्वीकारण्याचा संकल्प केला. सदर शिबिरासाठि ग्रामपंचायत सदस्य, गावातील प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होती. नेत्र तपासणी शिबिरयशस्वी करण्यासाठी रासेयो स्वयंसेवक व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

दुपारच्या सत्रात अझोला प्रकल्प व गांडूळखतः शाश्वत शेती या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.डॉ. व्ही. बी. कल्याणकर, प्राणीशास्त्र विभाग प्रमुख यांनी अझोला लागवड प्रक्रिया, पशुधनासाठी चारा, दूध वाढवण्यासाठी अझोला संस्कृतीचे फायदे आणि अझोला रोपे कुठे खरेदी करावी याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी श्री.घनश्याम बहिरवाल, श्री.व्ही.डी.देशमुख, (मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गोंडाळा), शंकर आप्पा कीर्तनकार (मुख्य पुजारी, वंशेश्वर महादेव संस्थान गोंडाळा), भीमराव कोळेकर तसेच गावकरी मंडळी उपस्थित होते.

दिनांक ०६/०२/२०२६ शुक्रवार रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष युवक शिबिरात रक्त तपासणी शिबिर आयोजीत करन्यात आले होते. सदर विशेष युवक शिबिरामध्ये प्रस्तुत महाविद्यालय व जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा कार्यक्रम अधिकारी सामान्य रुग्णालय व वैद्यकीय अधीक्षक ग्रामीण रुग्णालय सेनगाव यांच्या संयुक्त विद्यमाने एच आय व्ही (HIV), सिकलसेल, हिमोग्लोबिन व रक्तगट तपासणी शिबिर भरघोस प्रतिसादा सह संपन्न झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. पी बी पाटील, संदीप राठोड- समुपदेशक किशोरवयीन गट ग्रामीण रुग्णालय सेनगाव,स्वाती पारसकर- प्रयोगशाळा तंत्रज्ञ ग्रामीण रुग्णालय सेनगाव, तर प्रमुख उपस्थितीत डॉ. यु एल साहु, प्रा टी यु केंद्र, प्रा. एन. एस. गायकवाड, डॉ. प्रवीण तोतला,डॉ. अखिलेश बजाज, प्रा. कुलदीप पवार, डॉ. राधेश्याम चव्हाण आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती. रक्त तपासणी करण्यासाठी संदीप राठोड (समुपदेशक किशोरवयीन गट) स्वाती पारसकर (प्रयोगशाळा तंत्रज्ञ) आदी तंत्रज्ञ मंडळींनी ४६ एचआयव्ही तपासणी तर सिकलसेल हिमोग्लोबिन व रक्तगट तपासणी प्रत्येकी

४० व्यक्तींची केली. किशोरवयीन मुलींना आयर्नच्या गोळ्या देण्यात आल्या तसेच सकस आहाराचे महत्व समजून सांगण्यात आले. याप्रसंगी रक्त तपासणी शिबिर यशस्वी करण्यासाठी रासेयो स्वयंसेवक व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

दिनांक ०७/०२/२०२६ शनिवार रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने पशुरोग निदान व पशुधन संवर्धन शिबिराचे आयोजन वंशेश्वर गोशाळा गोंडाळा येथे करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. ए. पी. नाईक, प्रमुख मान्यवर मंडळीत पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष कानेडखेडकर – सहाय्यक आयुक्त तालुका पशु चिकित्सालय सेनगाव, पशु चिकित्सा सहाय्यकश्री विनय राठोड, श्री रवी कांबळे, ज्ञानेश्वर खरात तसेच वंशेश्वर गोशाळा समन्वयक श्री भीमराव कोळेकर आदी मंडळी उपस्थित होती. शिबिराच्या प्रारंभी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी सामूहिकपणे गाईचे पूजन करत पशुधनाची श्रीमंती हीच देशाची संपत्ती होय डॉ कानेडखेडकर यांनी लसीकरणाचे महत्त्व विशद करताना सांगितले की अनेक रोग जनावरांच्या संपर्कातून मनुष्यास होत आहे त्यासाठी पुरेशी काळजी घेणे गरजेचे आहे. देशी पशुधन टिकविणे काळाची गरज असून त्या ळज्ञअनुषंगाने विशेष प्रयत्न ग्रामस्थांनी करायला हवेत उपलब्ध असलेल्या जनावरां तील जंत निर्मूलनासाठी गोळ्या देण्यात आल्या पुढील आठवड्यात लसीकरणाची विशेष मोहीम राबविली जाणार आहे त्याचा योग्य तो फायदा ग्रामस्थांनी घ्यावा असे आव्हान केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ज्ञानेश्वर तडस यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. आर व्ही नवगणकर यांनी केले.डॉ. संदीप मरकड, प्रा. निलेश गायकवाड,प्रा.दिनेश थोरात आदी मान्यवर मंडळींरासेयो स्वयंसेवक व ग्रामस्थांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.

दिनांक ०८/०२/२०२६ रविवार रोजी शिबिर समारोपाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष श्री सुभाष उबाळे, तर प्रमुख पाहुणे श्री.अक्षय पवार (ग्रामसेवक) तसेच गावकरी मंडळी उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात डॉ. आर. व्ही. नवगणकर यांनी सात दिवशीय शिबिराचे अहवाल वाचन केले. प्रमुख पाहुणे श्रीअक्षय पवार, ग्रामसेवकमोजे गोंडाळा यांनी सदर राबवलेल्या उपक्रमांची उपयुक्तता व मत महत्त्व जाणून घेऊन शिबिरार्थिंचे आभार मानले. तसेच सायबर साक्षरता व सुरक्षा, नशामुक्ति, बालविवाह प्रतिबंध करण्यासाठी तसेच ग्रामस्थांमध्ये मतदार जनजागृती, समृद्ध लोकशाही, ग्राम स्वच्छताव गावातील सांडपाण्याचे व्यवस्थापन सर्वोतोपरी प्रयत्न करीत असुन ग्रामस्थांचे आरोग्य जपण्यासाठी मी कटीबद्ध असुन सतत प्रयत्न करत राहील असे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. डी. पी. तडस तर आभार डॉ. जी. पी. भालेराव यांनी केले.रासेयो स्वयंसेवक व ग्रामस्थांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.




GPS Map Camera
Sengaon, Maharashtra, India
Qvpx+4xc, Sengaon, Maharashtra 431542, India
23/08/2025 01:19 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Sengaon, Maharashtra, India
Google


GPS Map Camera
Sengaon, Maharashtra, India
Qvpx+4xc, Sengaon, Maharashtra 431542, India
Lat 19.784255° Long 76.8997°
24/09/2025 11:08 AM GMT +05:30




Sengaon 2026.01.22 15:13

# सांस्कृतिक विभाग

**डॉ. विजय वाघ**
(सांस्कृतिक विभाग प्रमुख)

विद्यार्थांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा हा हेतू मनाशी बाळगूण दरवर्षी सांस्कृतिक मंडळाची स्थापना केली जाते.शेक्षणिक वर्ष २०२५ - २०२६ या वर्षासाठी प्राचार्य प्रो. डॉ.एस.जी.तळणीकर यांच्या उपस्थितीत सांस्कृतिक समितीची स्थापना करण्यात आली.

*** सांस्कृतिक समिती :-**

अध्यक्ष:- गायत्री काळबांडे
उपाध्यक्ष:- रेणुका मादंळे
कोषाध्यक्ष :- कोमल भुरे
सचिव:- ओंकार कोळपे
सहसचिव:- करण नायक
सदस्य:- दिव्या घनमोडे
सदस्य:- दिव्या नायक

या विद्यार्थांची निवड करण्यात आली.याप्रसंगी सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.वाघ व्हि.जी.,प्रा.घन पी.के.,डॉ.पजई एस.आर., डॉ.गोरे आर.एस.,डॉ.सावंत डी.जी.,डॉ.टापरे ए.डी. या प्रसंगी उपस्थित होते.

*** राष्ट्रस्तरीय, राज्यस्तरीय, विद्यापीठस्तरीय, आंतर महाविद्यालयीन, राज्यस्तरीयवाद-विवाद स्पर्धा, वकृत्व स्पर्धा व युवक महोत्सवामध्ये होणाऱ्या विविध कला प्रकारा मध्ये सहभाग :-**

*** ज्ञानतीर्थ - २०२५ आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवात तोष्णीवाल महाविद्यालयाला चा सहभाग :-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पस, विष्णुपुरी, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १२ ते १५ ऑक्टोबर २०२५ रोजी आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव 'ज्ञानतीर्थ-२०२५ ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पस, विष्णुपुरी, नांदेड येथे यशस्वी संपन्न झाला .

नांदेड, लातूर, परभणी व हिंगोली या चार जिल्ह्यातील दोन हजारा पर्यंत युवक - युवतींनी ३० कला प्रकारात आपला सहभाग नोंदवला.

तोष्णीवाल महाविद्यालयातील गायत्री काळबांडे - वक्तृत्व, वादविवाद, रेणुका मांदळे - वादविवाद, कलात्मक जुळवणी, दिव्या घनमोडे - चित्रकला,कोलाज, ,व्यंग्यचित्रकला, कलात्मक जुळवणी, अंजली स्वामी - पोस्टर पेंटिंग, रांगोळी मृदमूर्तीकला, कलात्मक जुळवणी, कोमल भुरे - मेहंदी, कलात्मक जुळवणी, व ओंकार कोळपे- शास्त्रीय तालवाद्य, शास्त्रीय सूरवाद्य यांनी एकुण १२ कला प्रकारामध्ये सहभाग नोंदवला.

या संघा सोबत संघव्यवस्थापक म्हणून डॉ.विजय वाघ सांस्कृतिक विभाग प्रमुख व संघव्यवस्थापिका प्रा.ज्योती सोनसळे यांनी काम पाहीले.

सहभागी स्पर्धेकाचे संस्थेचे अध्यक्ष श्री.ब्रिजगोपाल तोष्णीवाल, महाविद्यालयीन विकास समितिचे अध्यक्ष श्री. रमण तोष्णीवाल, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.श्रीपाद तळणीकर, महाविद्यालयाचे प्राध्यापक व शिक्षेत्तर कर्मचारी यासर्वानी विजेत्या व सहभागी स्पर्धेकांचे अभिनंदन केले.

**❋ वक्तृत्व स्पर्धा:-**

❋ तोष्णीवाल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सांस्कृतिक विभाग आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाडा मुक्ती संग्राम दिन व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित जिल्हास्तरीय वकृत्व स्पर्धा दिनांक ११ सप्टेंबर २०२५ रोज गुरुवार ला महाविद्यालयात पार पडली. सदरील स्पर्धा ही दिनांक ११ सप्टेंबर २०२५ ते १९ सप्टेंबर २०२५ या कालावधीत विद्यापीठ वर्धमान सप्ताह साजरा करण्यात येत आहे त्या अनुषंगाने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

वक्तृत्व स्पर्धेसाठी जिल्ह्यातील चार महाविद्यालयातील आठ स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदवला. प्रथम क्रंमाक कु.काळबांडे गायत्री शंकर रु.१०००/- व प्रमाणपत्र (तोष्णीवाल महाविद्यालय सेनगाव ) द्वितीय क्रमांक कु.केंद्रे सपना विठ्ठल रु.७००/- व प्रमाणपत्र ब तृतीय क्रंमाक उबाळे आकाश नरेंद्र रु.५००/- व प्रमाणपत्र (तोष्णीवाल महाविद्यालय सेनगाव ) यांना मिळाला.

(स्पर्धेचा विषय : 'राष्ट्रीय शिक्षण धोरण व मराठवाड्यातील उच्च शिक्षणाची दिशा'.)

❋ शिवजयंती महोत्सव समिती, हिंगोली यांच्या वतीने दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर, हिंगोली येथे वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत तोष्णीवाल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सेनगाव येथील विद्यार्थिनी गायत्री शंकर काळबांडे हिने आपल्या प्रभावी व ओजस्वी वक्तृत्वातून उपस्थितांची मने जिंकत प्रथम क्रमांक पटकावला. तिच्या उत्कृष्ट सादरीकरणाबद्दल तिला २००१/- रोख पारितोषिक, शिवचरित्र ग्रंथ व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

या स्पर्धेत महाविद्यालयातील रेणुका संतोष मांदळे हिनेही उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपली वक्तृत्वकला प्रभावीपणे सादर केली. या स्पर्धेत शालेय व महाविद्यालयीन अशा एकूण १४७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता, ही बाब स्पर्धेची प्रतिष्ठा आणि व्यापकता अधोरेखित करणारी ठरली.

(स्पर्धेचा विषय : राष्ट्र विकासासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांची आवश्यकता.)

❋ कै.रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ जि.परभणी द्वारा आयोजित ङ्ककै.राजाभाऊ दादाराव कदम राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा २०२४-२०२५ङ्क या राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धे मध्ये कृष्णा शेषराव धस यांनी सहभाग घेतला .

(स्पर्धेचा विषय : राजकारणाचे गुन्हेगारीकरण, अभिजात मराठी भाषा: संधी आणि आव्हाने,वेबसिरीजच्या विळख्यात अडकलेली तरुणाई .)

**❋ वाद-विवाद स्पर्धा:-**

❋ शिवाजी महाविद्यालय, हिंगोली यांच्या वतीने दिनांक २९ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित कै. एकनाथराव पवार स्मृतीप्रित्यर्थ आंतरमहाविद्यालयीन वाद-विवाद स्पर्धेत तोष्णीवाल महाविद्यालय, सेनगाव येथील रेणुका संतोष मांदळे व गायत्री शंकर काळबांडे या संघाने उत्कृष्ट सादरीकरण करत प्रथम क्रमांक पटकावला. या स्पर्धेत विजेत्या संघास ३००१/- रोख रक्कम, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र असा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला

( स्पर्धेचा विषय : पहिली पासून त्रिभाषा सूत्र राबविणे - योग्य की अयोग्य .)

❋ नांदेड एजुकेशन सोसायटी अमृत महोत्सव सायन्स कॉलेज नांदेड च्या वतीने ब्रम्हीभूत स्वामी

रामानंद राज्यस्तरीय वाद-विवाद स्पर्धे मध्ये कु. रेणुका संतोष मांदळे व कु.गायत्री शंकर काळबांडे यांनी सहभाग घेतला.

( स्पर्धेचा विषय : भारतीय निवडणुकांची विश्वसनियता धोक्यात आली आहे /नाही.)

* तोष्णीवाल महाविद्यालय, सेनगाव कै.अयोध्याबाई रामनारायण तोष्णीवालयांच्या स्मरणार्थ राज्यस्तरीय वाद-विवाद स्पर्धे मध्ये पदवी विभागातून कु. रेणुका संतोष मांदळे व कु.गायत्री शंकर काळबांडे तर पदव्युत्तर विभागातून दिव्या धनंजय गोल्हारे व निकिता अश्रप्पा शेरकर यांनी सहभाग घेतला.

या स्पर्धेत उत्कृष्ट वक्ता म्हणून कु. कु.गायत्री शंकर काळबांडे ला रोख ३०००रु व प्रमाणपत्र असा पुरस्कार प्राप्त झाला.

(स्पर्धेचा विषय : कृतिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान (अख) भारताच्या विकासासाठी तारक / मारक )

*** निबंध स्पर्धा:-**

* दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी स्व.शीवलालजी राठी स्मृती प्रतिष्ठान व स्व. हरिकिसन बजाज माहेश्वरी शिक्षण विकास संस्था तर्फे घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत तोष्णीवाल महाविद्यालय, सेनगाव येथील वरिष्ठ विभाग -१६ कनिष्ठ विभाग-६९ स्पर्धकांची या संघाने उत्कृष्ट सहभाग नोंदविला. या केंद्र निहाय स्पर्धेत प्रथम - पुष्पा नवनाथ घोशीर , द्वितीय - गणेश विष्णुआप्पा सोनटक्के व तृतीय - अक्षरा नंदू खंदारे यांनी पारितोषिक व प्रमाणपत्र पटकावले.

* महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी, मुंबई आणि प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी दिनांक १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर दरम्यान विद्यापीठ स्तरीय निबंध स्पर्धा यशस्वीपणे संपन्न झाली.

या स्पर्धेत तोष्णीवाल महाविद्यालय येथील शामल कुलभूषण भुरे हिने आपली निबंधकला प्रभावीपणे सादर करून उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवले. या मध्ये तिला रु .५००/- स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले.

महाविद्यालयातील विजया कुटे, शामल गडदे, रोशनी वाघ, कोमल भुरे आणि सोनम सय्यद कदिर यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपली लेखनक्षमता सिद्ध केली.

( स्पर्धेचा विषय : 'स्वच्छता अभियान : यश आणि आव्हाने)

* शंकरराव चव्हाण महाविद्यालय, अर्धापूर महाविद्यालया च्या रौप्य महोत्सवी वर्षा निमित्त आणि कै.डॉ.शंकररावजी चव्हाण साहेब व कै.कुसुमताई चव्हाण यांच्या सृम्तिप्रित्यर्थ मराठी विभाग आयोजित राज्य स्तरीय आंतरमहाविद्यालयीन निबंध स्पर्धेत दिपाली रामकिसन माने व गायत्री शंकर काळबांडे यांनी सहभाग नोंदविला.

( स्पर्धेचा विषय : 'स्वच्छता अभियान : यश आणि आव्हाने)

महाविद्यालयीन स्तरावर थोरा मोठ्यांच्या जयंती व पुण्यतिथी कार्यक्रमाचे आयोजन :-

संत कबीर जयंती,प्रेमचंद जयंती,संत नामदेव महाराज पुण्यतिथी,लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती,महात्मा गांधी जयंती,पंडीत जवाहरलाल नेहरू जयंती,महात्मा फुले पुण्यतिथी संत गाडगेबाबा पुण्यतिथी सावित्रीबाई फुले जयंती,छत्रपती शिवाजी महाराज जयंती, यशवंतराव चव्हाण जयंती इत्यादी थोरा मोठ्यांच्या जयंती व पुण्यतिथी ईत्यादी कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक विभागामार्फत करण्यात आले.







## वक्क्तृत्व स्पर्धेत तोष्णीवाल महाविद्यालयाची गायत्री अव्वल

हिंगोली, ता. १२ : सेनगाव येथील तोष्णीवाल महाविद्यालयात जिल्हा स्तरीय वकृत्व स्पर्धा घेण्यात आली. ज्यात तोष्णीवालच्या गायत्री यांनी अव्वल क्रमांक पटकावला.

सांस्कृतिक विभाग आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नंदेड यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित जिल्हा स्तरीय वकृत्व स्पर्धा गुरवारी महाविद्यालयात पार पडली.

सदर स्पर्धा ही दिनांक ११ सप्टेंबर ते १९ सप्टेंबर या कालावधीत विद्यापीठ वर्धमान सप्ताह साजरा करण्याच्या अनुषंगाने झाली. या स्पर्धेचे आयोजन ''राष्ट्रीय शिक्षण धोरण व मराठवाड्यातील उच्च शिक्षणाची दिशा'' या विषयावर करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे डॉ.पी.बी. पाटील, प्रमुख पाहुणे डॉ.एस.एस. अग्रवाल, डॉ. सोनाजी पतंगे, डॉ. माणिक डोखळे, स्पर्धेचे परीक्षक प्रा.पी.के. घन, डॉ.डी. जी. सावंत, डॉ.ए.डी. टापरे, डॉ.ए.पी. नाईक आणि महाविद्यालयाचे सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. व्ही.जी. वाघ हे मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. वाघ यांनी केले.







# ‘स्नेहोत्सव’ – वार्षिक स्नेहसंमेलन

सेनगाव, येथील तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सेनगाव येथे स्नेहोत्सव – वार्षिक स्नेहसंमेलन २०२६ चे आयोजन दिनांक ६ फेब्रुवारी २०२६ (शुक्रवार) रोजी उत्साहात करण्यात आले.

या स्नेहोत्सव वार्षिक स्नेहसंमेलनाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. जी. तळणीकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. राजेश जोशी तसेच वाणिज्य शाखेचे विभागप्रमुख प्रो. डॉ. संजीव अग्रवाल उपस्थित होते. कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. विजय वाघ हेही मंचावर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. विजय वाघ यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी महाविद्यालयीन अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये दडलेल्या सुप्त कलागुणांचा विकास होणे आवश्यक असल्याचे नमूद केले तसेच विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

प्रमुख अतिथी डॉ. राजेश जोशी यांनी स्नेहसंमेलनामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या कलागुणांसाठी योग्य व्यासपीठ मिळते, तसेच सांस्कृतिक गुणांबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव असणे तितकेच महत्त्वाचे असल्याचे मत व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. एस. जी. तळणीकर यांनी महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी विविध संधी उपलब्ध करून दिल्या जात असल्याचे सांगून, त्या संधींचा योग्य उपयोग विद्यार्थ्यांनी करावा, असा मोलाचा सल्ला दिला.

उद्घाटनानंतर स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी विविध कला प्रकारांचे रंगारंग सादरीकरण केले. यामध्ये रांगोळी, मेहंदी, चित्रकला, आनंद नगरी तसेच समूह नृत्य, वैयक्तिक नृत्य, गीतगायन आणि वाद्यवृंद वादन या कला प्रकारांचा समावेश होता. वाद्यवृंदामध्ये बासरी वादन, पखवाज वादन, मृदुंग वादन व हार्मोनियम वादन या कला प्रकारांचे सादरीकरण मोठ्या उत्साहात करण्यात आले.

यानंतर विविध स्पर्धांतील विजेत्या व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

**स्पर्धांचे निकाल पुढीलप्रमाणे :**

*** रांगोळी स्पर्धा**

प्रथम क्रमांक – पायल वाघ व स्नेहा तिवारी
द्वितीय क्रमांक – दिपाली मगर व सावित्री शेळके
तृतीय क्रमांक – अंजली स्वामी व सिद्धी सोमाणी

*** मेहंदी कला**

प्रथम क्रमांक – पल्लवी गुंजकर व अंजली स्वामी
द्वितीय क्रमांक – अंजुम पठाण व मयुरी वानखेडे
तृतीय क्रमांक – अंकिता चव्हाण

*** चित्रकला**

प्रथम क्रमांक – स्नेहा तिवारी
द्वितीय क्रमांक – अंकिता चव्हाण
तृतीय क्रमांक – सिद्धी सोमाणी

*** विविध कला प्रकार सादरीकरण**

पखवाज वादन – कार्तिक घनमोडे
बासरी वादन – नागेश कापसे
हार्मोनियम वादन – अमोल कांबळे
वैयक्तिक नृत्य – अस्मिता वाकळे
समूह नृत्य – पूजा वाकळे, नेहा पाईकराव, पूजा कुटे व आरती झुंगरे.
गीत गायन – आरती धोत्रे

तसेच स्नेहसंमेलना मध्ये सहभागी ४५ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी

सांस्कृतिक विभागाचे प्रो.डॉ.दत्ता सावंत,प्रो.डॉ.राजेश गोरे, डॉ. अंजली टापरे तसेच डॉ. निखिलेश बजाज, डॉ.भगवान घुटे, डॉ.अरविंद नाईक, डॉ.धनाजी पाटील, डॉ.अशोक अंभोरे, प्रा. दिनेश थोरात, प्रा.कुलदीप पवार,डॉ.प्रविण तोतला, प्रा.निलेश गायकवाड व प्रा. ज्योती सोनसळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रो. डॉ. राजेश गोरे यांनी केले तर डॉ. अंजली टापरे यांनी आभार प्रदर्शन केले.

या स्नेहोत्सव वार्षिक स्नेहसंमेलनासाठी महाविद्यालयाचे प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## तोषनिवाल मध्ये वार्षिक स्नेहसंमेलनात कला अविष्काराचा जागर

सेनगाव - येथील तोष्णीवाल महाविद्यालयात स्नेहोत्सव - वार्षिक स्नेहसंमेलन २०२६ चे शुक्रवारी उत्साहात पार पडले. या स्नेहोत्सव वार्षिक स्नेहसंमेलनाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. जी. तळणीकर होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून आय.क्यू.ए.सी. समन्वयक विजय वाघ आदींची उपस्थिती होती. प्रास्ताविक सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. विजय वाघ यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात विकास होणे आवश्यक असल्याचे नमूद केले तसेच विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

डॉ. राजेश जोशी यांनी स्नेहसंमेलनामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या कलागुणांसाठी योग्य व्यासपीठ मिळते, तसेच सांस्कृतिक गुणांबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव असणे तितकेच महत्त्वाचे असल्याचे मत व्यक्त केले.

प्राचार्य डॉ. एस. जी. तळणीकर यांनी महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी विविध संधी उपलब्ध करून दिल्या जात असल्याचे सांगून, त्या संधींचा योग्य

विद्यार्थ्यांनी विविध कला प्रकारांचे रंगारंग सादरीकरण केले. यामध्ये रांगोळी, मेहंदी, चित्रकला, आनंद नगरी तसेच समूह नृत्य, वैयक्तिक नृत्य, गीतगायन आणि वाद्यवृंद वादन या कला प्रकारांचा समावेश होता. वाद्यवृंदामध्ये बासरी वादन, पखवाज वादन, मृदुंग वादन व हार्मोनियम वादन या कला प्रकारांचे सादरीकरण मोठ्या उत्साहात करण्यात आले. स्पर्धातील विजेत्या व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. यशस्वीतेसाठी प्रो. दत्ता सावंत, डॉ. राजेश गोरे, डॉ. अंजली टापरे, डॉ. निखिलेश बजाज, डॉ. भगवान घुटे, डॉ. अरविंद नाईक, डॉ. धनाजी पाटील, डॉ. अशोक अंभोरे, प्रा. दिनेश थोरात, प्रा. कुलदीप पवार, डॉ. प्रवीण तोतला, प्रा.

**रांगोळी स्पर्धेतील विजेते...**
प्रथम क्रमांक पायल वाघ व स्नेहा तिवारी,
द्वितीय क्रमांक दिपाली मगर व सावित्री शेळके,
तृतीय क्रमांक अंजली स्वामी व सिद्धी सोमाणी.

**मेहंदी कला...**
प्रथम क्रमांक पल्लवी गुंजकर व अंजली स्वामी,
द्वितीय क्रमांक अंजुम पठाण व मयुरी वानखेडे,
तृतीय क्रमांक अंकिता चव्हाण

**विविध कला प्रकार सादरीकरण**
पखवाज वादन कार्तिक घनमोडे, बासरी वादन नागेश कापसे, हार्मो नियम वादन,अमोल कांबळे यासह वैयक्तिक नृत्य मध्ये अस्मिता वाकळे, तर समूह नृत्य पूजा वाकळे, नेहा पाईकराव, पूजा कुटे व आरती झुंगरे यांना पारितोषिक देण्यात आले.गीत गायन स्पर्धेत आरती धोत्रे हिला पुरस्कार देण्यात आला. सहभागी ४५ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

**चित्रकला स्पर्धेतील विजेते...**
प्रथम क्रमांक स्नेहा तिवारी,
द्वितीय क्रमांक अंकिता चव्हाण,
तर तृतीय क्रमांक सिद्धी सोमाणी.

## तोष्णीवाल महाविद्यालयात स्नेहोत्सव

▶ हिंगोली (वा.) सेनगाव येथे तोष्णीवाल महाविद्यालयाच्या वतीने आयोजित 'स्नेहोत्सव – वार्षिक स्नेहसंमेलन २०२६' हा सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या स्नेहसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. जी. तळणीकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. राजेश जोशी, वाणिज्य शाखा विभागप्रमुख प्रो. डॉ. संजीव अग्रवाल तसेच समन्वयक व सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. विजय वाघ मंचावर उपस्थित होते.



प्रास्ताविकात डॉ. विजय वाघ यांनी महाविद्यालयीन अभ्यासासोबत विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांचा विकास होणे अत्यावश्यक असल्याचे सांगून, विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. प्रमुख अतिथी डॉ. राजेश जोशी यांनी स्नेहसंमेलनामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या कलागुणांना योग्य व्यासपीठ मिळते, सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण होणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे मत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. एस. जी. तळणीकर यांनी सुप्त गुणांना वाव देण्यासाठी विविध संधी उपलब्ध करून दिल्या जात आहे, असे सांगितले.

epaper.navarashtra.com

# अभिनंदन





पदवीदान समारंभात पदवी प्रमाणपत्रांचे मान्यवरांच्या हस्ते वितरण



**गायत्री मुंदडा**
आय.यु.टी. क्रिकेट



**स्वाती कोरडे**
आय.यु.टी. क्रिकेट



**रूपाली शिंदे**
आय.यु.टी. रेसलिंग



**त्रिशला पांडूळे**
डी.झोन 4 x 100 रिले



**लक्ष्मी वामन**
डी.झोन 800 मिटर धावणे



**नयन कदम**
डी.झोन 200 मिटर धावणे



**बजरंग कदम**
आय.यु.टी. तलवारबाजी



**अभय अन्नपुर्णे**
आय.यु.टी. अश्वमेध (चेस)



**सय्यद समदी**
आय.यु.टी. फुटबॉल



**शेख उमर शे.जब्बार**
आय.यु.टी. फुटबॉल



**रेणुका मांदळे**
वादविवाद व वकृत्व स्पर्धा



**गायत्री काळबांडे**
वादविवाद व वकृत्व स्पर्धा



**लक्ष्मी रोडगे**
गुणवंत विद्यार्थीनी



**ओंकार कोळपे**
मृदंग व तबला वादन



**शामल भुरे**
निबंध व मेहंदी स्पर्धा



सायबर सिक्युरिटी कोर्स बद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत महाविद्यालयाच्या विद्यार्थीनीचे अभिनंदन करतांना



राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत दंत चिकित्सा शिबीर




माजी विद्यार्थी मेळावा





'हर घर शिक्षक' अभियानाअंतर्गत विद्यार्थ्यांच्या घरी भेट



वार्षिक स्नेह संमेलनातील सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप करताना

# तोष्णीवालच्या महारोजगार मेळाव्यात २८८ उमेदवारांनी दिल्या मुलाखती



# तोष्णीवाल मध्ये स्नेहोत्सव - वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात



### रांगोळी स्पर्धेतील विजेते...

### मेहंदी कला...

### चित्रकला स्पर्धेतील विजेते...

### विविध कला प्रकार सादरीकरण

# अंतर्गत मूल्यमापन व लेखनकौशल्याचा संगम; सेनगावच्या तोष्णीवाल महाविद्यालयात कार्यशाळा



# गोंडाळा येथील पशु संवर्धन शिबिरात जनावरांची तपासणी



# सेनगावात जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा

## मराठवाडा मुक्ती संग्राम दिन व विद्यापीठाचा वर्धापनदिन कार्यक्रम



### 'शब्द असावा धारदार'

### ८ स्पर्धकांचा सहभाग

# तोष्णीवाल महाविद्यालयात एचआयव्ही जनजागृती

सेनगाव. येथील तोष्णीवाल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आंतरराष्ट्रीय युवा दिन पंधरवडा साजरा करण्यात आला .जगभरातील तरुणांच्या समस्यांकडे सरकार आणि सामान्य जनतेची लक्ष वेधण्यासाठी १२ ऑगस्ट हा दिवस जगभरात युवा दिन म्हणून साजरा केला जातो. त्या अनुषंगाने तोष्णीवाल महाविद्यालयात एच. आय. व्ही. एड्स जनजागृती अभियान आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. जी . तळणीकर तर प्रमुख पाहुण्या अलका रणवीर (संचालिका विहान हिंगोली), किशोर वानखेडे (समुपदेशक ग्रामीण रुग्णालय सेनगाव) डॉ. राजाभाऊ नवगणकर, डॉ. विकास कल्याणकर, प्रा. ज्ञानेश्वर तडस, प्रा. संजय फड ,डॉ. टापरे मॅडम आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. विकास कल्याणकर यांनी केले अलका रणवीर यांनी एचआयव्ही, गुप्तरोग याविषयी सविस्तर माहिती दिली. उपरोक्त आजार होण्यामागील चार कारणांचा उहापोह केला. विहान संस्थेमार्फत युवकांमध्ये जनजागृती करण्यासाठी अविरतपणे संस्थेचे कार्य चालते जर कोणाला या आजाराविषयी शंका उपस्थित झाली तर विना विलंब त्यांनी सरकारी रुग्णालयाशी संपर्क साधावा त्यातून भविष्यात होणाऱ्या अडचणी नक्कीच कमी होण्यास मदत होते. आज सरकारमार्फत एचआयव्हीग्रस्तांना दरमहा निशुल्क औषध, निशुल्क शस्त्रक्रिया केल्या जातात. या संस्थेत तीन हजार पाचशे पेक्षा अधिक एचआयव्हीग्रस्त सभासदांची नोंद आहे. त्या सर्वांना वेळोवेळी समुपदेशन करून सकारात्मक जीवन जगण्यास मदत केली जाते. किशोर वानखेडे यांनी महाराष्ट्र शासन उपरोक्त आजार संपावा यासाठी काय काय करते याची सविस्तर माहिती युवकांना दिली.

# ज्ञानदीप वार्षिकांक कार्यशाळेचे आयोजन



सेनगाव - येथील तोष्णीवाल महाविद्यालयात बुधवारी ज्ञानदीप वार्षिक अंक लेखनासंबंधी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. एस. जी. तळणीकर, वार्षिक अंक समिती सदस्य डॉ. डी. जी. सावंत, प्रा. पी. के. घन, डॉ. ए. डी. टापरे, डॉ. व्ही. जी. वाघ आदींची उपस्थिती होती. यावेळी प्राचार्य तळणीकर यांनी विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना विशेषतः लेखन कौशल्याला वाव देण्यासाठी वार्षिक अंक हे एक महत्त्वाचे माध्यम असून यामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लेखन केले पाहिजे व यातून आपल्या कल्पना शक्तीचा विकास करून घेतला पाहिजे असे आवाहन केले. त्यानंतर सावंत यांनी यावर्षी ग्राम संस्कृती या ठरवण्यात आलेल्या वार्षिक अंकाच्या विषयाबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. त्यामध्ये ग्रामीण भागातील लोकजीवन, संस्कृती, प्रथा- परंपरा व जीवन जगण्याच्या पद्धती यावर विद्यार्थी लेखन करू शकतात असे मत त्यांनी मांडले. पुढे बोलताना त्यांनी या संदर्भातील अनेक विषय विद्यार्थ्यांना सुचवले त्यामध्ये प्रामुख्याने गाव खेड्यांचे बदलते स्वरूप, ग्रामीण भागातील यात्रा, लोकगीते, ओव्या, भारुड, अभंग, यांचे संकलन, नातीगोती, पाहुणचार, लग्न समारंभ, सण-उत्सव, गावातील शाळा, भौगोलिक स्थान, निसर्ग, जुनी मनोरंजनाची साधने, लहानपणातील खेळ, अशा अनेक प्रकारच्या विषयांवर लेखन करता येते. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ व्ही. जी. वाघ यांनी तर आभार डॉ. ए. डी. टापरे यांनी मानले. कार्यशाळेसाठी वार्षिक अंक समितीत सहभागी असलेले सर्व विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

# रासेयो युवक शिबिरात करिअर व सायबर साक्षरतेचे धडे

देशोन्नती वृत्तसंकलन...

## गोंडाळा येथे तोष्णीवाल महाविद्यालयाचे शिबीर



सेनगाव : तालुक्यातील गोंडाळा येथे तोष्णीवाल महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे आयोजित सात दिवसीय विशेष युवक शिबिरात विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. ४ फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषद शाळेत पार पडलेल्या या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक व्ही. डी. देशमुख होते. यावेळी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. जी. पी. भालेराव, डॉ. आर. व्ही. नवगणकर, डॉ. डी. पी. तडस यांच्यासह साधन व्यक्ती म्हणून डॉ. आर. एस. गोरे, डॉ. डी. जी. सावंत, डॉ. विजय वाघ, डॉ. एच. टी. शिंदे, प्रा. बी. जे. गायकवाड व श्री प्रकाश देशमुख मंचावर उपस्थित होते. मार्गदर्शन करताना डॉ. डी. जी. सावंत यांनी 'दहावीनंतर काय?' या विषयावर विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. दहावीनंतर उपलब्ध असलेल्या कला, विज्ञान व वाणिज्य शाखांमधील करिअर संधी स्पष्ट करताना त्यांनी कला शाखा ही सर्व शाखांची जननी असल्याचे प्रतिपादन केले. तसेच तोष्णीवाल महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रम, उपक्रम व पायाभूत सुविधांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. 'सायबर साक्षरता व सुरक्षितता काळाची गरज' या विषयावर बोलताना डॉ. आर. एस. गोरे यांनी डिजिटल युगातील धोके व संधी यावर प्रकाश टाकला. सायबर गुन्हेगारी ही अदृश्य असली तरी ती गंभीर स्वरूपाची असल्याने प्रत्येकाने सजग राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. 'तंत्रज्ञान आपला मित्र आहे; मात्र जागृती नसल्यास ते शत्रू ठरू शकते,' असे त्यांनी ठामपणे नमूद केले.

यावेळी डॉ. विजय वाघ यांनी दहावीच्या परीक्षेबाबत मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी नकारात्मक विचारां-पासून दूर राहून आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जाण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक व्ही. डी. देशमुख यांनी केले, तर आभार डॉ. जी. पी. भालेराव यांनी मानले. (तालुका प्रतिनिधी)

# गोंडाळा येथे रासेयो विशेष युवक शिबिरात नेत्र तपासणी शिबिर संपन्न

देशोन्नती वृत्तसंकलन...

सेनगाव : ५ फेब्रुवारी रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड, राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,सेनगाव येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित, शाश्वत विकासा साठी युवक जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसाड भमी विकासावर विशेष भर



एम एस नेत्ररोगतज्ञ, लक्ष्मी लाइफ केअर हॉस्पिटल हिंगोली , डॉ. स्वाती जोजार, अंगणवाडी आशा वर्कर, ललिता कौढारे इंदुबाई उबाळे, डॉ. प्रवीण तोतला डॉ. राजेश जोशी, डॉ. बजाज Opth लक्ष्मी लाईफ केअर हॉस्पिटल हिंगोली) यांनी ७० रुग्णांची नेत्र तपासणी केली त्यापैकी ३५ रुग्ण हे मोतीबिंदू बाधित असून त्यांच्या शस्त्रक्रियेची गरज आहे. ग्रामस्थांना डोळ्याविषयी सजग राहण्यासाठी काही महत्त्वपूर्ण बाबी सांगण्यात आल्या की ज्या ग्रामस्थांनी पूर्ण स्वीकारण्याचा संकल्प केला . ग्रामपंचायत सदस्य,



# सेनगाव महाविद्यालयात महापरिनिर्वाण दिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

सेनगाव येथील तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने ६ डिसेंबर रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अतुलनीय कार्याला अभिवादन करण्यासाठी महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. जी. तळणीकर यांनी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन केले. त्यानंतर डॉ. ए. जी. अंभोरे यांनी महामानवाच्या कार्याचा आढावा घेत भारतीय राज्यघटना ही न्याय, समता व बंधुता देणारी तसेच जगातील परिपूर्ण आणि कालसुसंगत राज्यघटना म्हणून सातत्याने गौरवली जाते, असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी, सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच एनएसएसचे विद्यार्थी



अर्थशास्त्र व वाणिज्य विभागाची संयुक्त आंतरराष्ट्रीय परिषदेत महात्मा गाधी यांच्या पुतळ्याचे पुजन करतांना मान्यवर



राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत मान्यवरांचे स्वागत करतांना



सांस्कृतिक विभागांतर्गत विजेत्या स्पर्धकांचे अभिनंदन करतांना



विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन करताना



माजी विद्यार्थी मेळाव्याचे उद्घाटन करतांना




राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष वार्षिक युवक शिबीर



जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन करतांना



प्रा.सुपारे सर यांचा सेवापूर्ती निमित सत्कार करतांना प्राध्यापकवृंद